# पदोन्नतीसाठी गोपनीय अहवाल

भाग

२२

**कनिष्ठ पद/संवर्ग/सेवामधून वरिष्ठ पद/संवर्ग/**
**सेवामधील पदोन्नती करताना पाळावयाची तत्वे-**
**गोपनीय अहवाल**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-१०८९/प्र.क्र.१२/८९/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २८ मार्च, १९९०

वाचा:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक: एसआरव्ही-१०७४/डी.
दिनांक २८ जानेवारी, १९७५

शासन निर्णय:-

विभिन्न पदावरील पदोन्नतीसाठी कर्मचाऱ्यांची निवड करणाऱ्या पदोन्नती समिती/मंडळे यांनी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची पदोन्नतीसाठीची योग्यायोग्यता तपासताना किती वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घ्यावेत, याबाबत आतापर्यन्त निश्चित स्वरूपाचे असे सर्वसाधारण आदेश नाहीत. त्यामुळे काही समित्या पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेतात तर काही समित्या फक्त तीन वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेतात. तथापि अशा कार्यवाहीकरिता निश्चित स्वरुपाचे आदेश असावेत व कार्यपध्दतीत सुसूत्रता यावी म्हणून शासनाचे आता असे आदेश आहेत की, यापुढे विभिन्न पदावरील पदोन्नत्यांसाठी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची पदोन्नतीसाठीची योग्यायोग्यता तपासताना निवडसूची तयार करावयाच्या वेळी त्यांचे अलिकडचे पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

भा. म. भणगे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**पदोन्नती—**

**गोपनीय अहवालांच्या प्रतवारीचे निकष**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-१०८८/(प्र.क्र.११/८८)/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २१ फेब्रुवारी, १९९४.

वाचा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक: इएसबी-सीएफआर-१०८५/ ८६८/१३, दिनांक ९ सप्टेंबर, १९८८

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७४/ड, दिनांक २८ जानेवारी, १९७५

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/ ७९/१२, दिनांक १८ मे, १९८३

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११-८८/१२, दिनांक १८ ऑक्टोबर, १९८८

**शासन निर्णय**

सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक: इएसबी-सीएफआर-१०८५/८६८/तेरा, दिनांक ९ सप्टेंबर, १९८८ च्या शासन निर्णयान्वये शासकीय सेवकांच्या प्रतिवर्षी लिहिल्या जाणाऱ्या गोपनीय अभिलेख्यांची प्रतवारी कोणती ठरवावी, याबद्दलच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७४/ड, दिनांक २८ जानेवारी, १९७५ अन्वये वर्ग-१ मधील (आता गट-अ) प्रथम पदोन्नतीच्या सर्व पदांवरील पदोन्नत्या, ज्येष्ठता अधीन पात्रता आणि त्यानंतरच्या वरच्या पदांवरील पदोन्नत्या निव्वळ गुणवत्ता तत्वांनी करण्यात याव्यात, असे शासनाचे धोरण आहे. पदोन्नतीसाठी पात्रता ठरविताना शासकीय सेवकांचे लगतचे ५ वर्षाचे गोपनीय अभिलेख तपासले जातात. परंतु गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचा, निकष कोणता असावा यासंबंधीचे निश्चित असे आदेश निर्गमित कलेले नाहीत. त्यामुळे निवडसूची बनविताना पात्रतेच्या निकषाबाबत संदिग्धता रहात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अतएव शासनाने या बाबींसंबंधात सर्वंकष तपासणी करून वरच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकषांबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

(१) शासन सेवेतील गट अ मधील प्रथम पदांवरील पदापर्यन्तच्या सर्व गटांतील पदोन्नत्या ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषानुसार देण्यात याव्यात. पात्रता निश्चित करण्यासाठी विचारक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांचे ५ वर्षाचे गोपनीय अभिलेख तपासून शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८९/३६५४/प्र.क्र.१२/८९/१२, दिनांक २८ मार्च, १९९० मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्यांच्या गोपनीय अभिलेख्यांची किमान सरासरी प्रतवारी "ब" (बी) येत असेल तर संबंधितांना ज्येष्ठतेनुसार निवडसूचीत अंतर्भूत करण्यात यावे.

(२) गट अ मधील दुसऱ्या टप्प्यानंतरच्या, परंतु ज्या पदांच्या वेतनश्रेणीतील किमान वेतनश्रेणीचा टप्पा रु.५१००/- आहे अशा सर्व पदांवरील पदोन्नत्या निव्वळ गुणवत्ता (Strict Selection) नुसार देण्यात याव्यात. त्यासाठी ५ वर्षाच्या गोपनीय अभिलेख्यांची किमान सरासरी प्रतवारी "ब+" अशी निश्चित करण्यात यावी.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/७९/१२, दिनांक १८ मे, १९८३ आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११-८८/१२, दिनांक १८ ऑक्टोबर, १९८८ अन्वये निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत ज्यांचे गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट "अ+" किंवा उत्कृष्ट "अ" प्रतीचे असतील त्यांना निवडसूचीमध्ये अनुक्रमे ६ आणि २ स्थानापर्यन्त वरचढपणा द्यावा असे आदेश आहेत. २ स्थानांपर्यन्त वरचढपणा देण्याबाबतचे आदेश आता मागे घेण्यात येत आहेत. अत्युत्कृष्ट "अ+" प्रतवारी असणाऱ्या अधिकाऱ्यांस/ कर्मचाऱ्यांस निवडसूचीमध्ये ६ स्थानांपर्यन्त वरचढपणा देण्याचे विद्यमान आदेश पुढील आदेश होईपर्यन्त कार्यान्वित राहतील. मात्र अशा अधिकाऱ्यांस ज्येष्ठ असलेल्या अधिकाऱ्यांचे अभिलेख "अ" प्रतवारीचे असतील तर त्यांचे वर "अत्युत्कृष्ट" गोपनीय अभिलेख असणाऱ्या अधिकाऱ्यास वरचढपणा देण्यात येऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

य. मा. जोशी

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**पदोन्नती**
**गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकष**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२०/०२/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ डिसेंबर, २००२.

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:ईएसटी-११८९/९०-८९/१३,
दिनांक ३१ जानेवारी, १९९०.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/(८८)/१२,
दिनांक २१ फेब्रुवारी, १९९४.
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/(८८)/१२,
दिनांक २२ सप्टेंबर, १९९४.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.२१ फेब्रुवारी, १९९४ च्या शासन निर्णयान्वये गट-अ मधील पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदांवर तसेच गट-अ मधील पुढील टप्प्यांवरील पदांवर पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालांच्या सरासरी प्रतवारीचे निकष विहित केलेले आहेत. त्याचप्रमाणे संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दि.२२ सप्टेंबर, १९९४ च्या शासन निर्णयान्वये या प्रत्येक टप्प्यावरील पदांच्या ४ थ्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार अंमलात आलेल्या वेतनश्रेणीच्या अनुषंगाने वेतनश्रेणीचे किमान टप्पे विहित केलेले आहेत.

२. ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणीच्या झालेल्या पुनर्रचनेच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दि.२२ सप्टेंबर,१९९४ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेले वेतनश्रेणीचे किमान टप्पे सुधारीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा दि.१ जानेवारी, १९९६ पासून झालेल्या वेतनश्रेणीच्या पुनर्रचनेनंतर पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालांच्या सरासरीचे सर्वसाधारण निकष आणि वेतनाचे टप्पे खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहेत :-

१) शासन सेवेतील गट-अ मधील पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदावरील पदोन्नती ही "ज्येष्ठता अधीन पात्रता" या तत्वावर होत असल्याने या पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालांच्या सरासरी प्रतवारीचा निकष "ब" असा निश्चित करण्यात यावा.

२) गट-अ मधील पहिल्या टप्प्यानंतरच्या सर्व पदोन्नत्या "ज्येष्ठता अधिन निव्वळ गुणवत्ता (Strict Selection/गुणवत्ता व ज्येष्ठता (Strict Selection with due regard seniority)" या तत्वावर करण्यात येत असल्याने त्यासाठी गोपनीय अहवालाच्या सरासरी प्रतवारीचे निकष खालीलप्रमाणे राहतील :-

(अ) गट-अ मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान (Minimum) टप्पा रुपये १६,३९९ पर्यंत आहे, त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची सरासरी प्रतवारी किमान "ब+" अशी असावी.

(ब) गट-अ मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान (Minimum) टप्पा रुपये १६,४०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची सरासरी प्रतवारी किमान "अ" अशी असावी.

(क) मात्र ज्या पदांसाठी शासनाने स्वतंत्र आदेशांन्वये गोपनीय अहवालांच्या सरासरीचे विविक्षीत निकष विहित केले असतील असे स्वतंत्र निकष ते वरील सर्वसाधारण निकषानुरुप नसले तरी अंमलात राहतील.

३. संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.२१ फेब्रुवारी, १९९४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ (३) मधील **"अत्युत्कृष्ट"** गोपनीय अहवाल असलेल्या कर्मचा-यास निवडसूचीत वरचढपणा देण्याबाबतचे आदेश यापुढेही अंमलात राहतील.

४. सदर आदेश ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत केलेल्या वेतनश्रेणी अंमलात आलेल्या दिनांकापासून म्हणजेच दि.१ जानेवारी, १९९६ पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बा.बा.नारायणकर
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

# मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करण्याबाबत

भाग

२३

मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे
सादर करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २ जून, २०१४

<u>संदर्भ -</u>

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीडीआर-१०८५/२५७९/४६/अकरा, दिनांक १५ जुलै, १९८६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीडीआर-१०८७/१७८१/५०/अकरा, दिनांक २४ नोव्हेंबर, १९८८.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-१००१/८१४/प्र.क्र.१४/०१/ अकरा, दिनांक ०९ जानेवारी, २००२.

<u>शासन निर्णय -</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १९ च्या पोटनियम (१) व त्याखालील टीप ३ अनुसार प्रत्येक शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्याने (गट-ड मधील कर्मचारी वगळता) कोणत्याही सेवेतील/पदावरील आपल्या प्रथम नियुक्तीच्या वेळी व त्यानंतर शासन विहित करेल त्या-त्या वेळी विहित नमुन्यामध्ये आपले मत्ता व दायित्व याबाबतचे विवरण सादर करणे बंधनकारक आहे. सादर विवरण सादर करण्याबाबत संदर्भाकित शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचना अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत :-

(I) <u>प्रथम नियुक्तीच्या वेळी सादर करावयाचे विवरण</u> :-

प्रत्येक राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्याने (गट-ड मधील कर्मचारी वगळता) राज्य शासनाच्या सेवेतील कोणत्याही पदावरील नियुक्तीद्वारे होणाऱ्या त्याच्या प्रथम सेवा प्रवेशाच्या वेळी, अशा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत त्याची स्वत:ची मत्ता व दायित्वे याबद्दलची विवरणे या निर्णयास जोडलेल्या प्रपत्र एक, दोन व तीन या तीन प्रपत्रांमध्ये [म्हणजे (अ) अचल मालमत्तेचे विवरण, (ब) चल मालमत्तेचे विवरण आणि (क) कर्जे व इतर दायित्वे याबदलचे विवरण] शासनास सादर करावीत. या निर्णयाच्या दिनांकास राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या व यापूर्वी याप्रमाणे विवरण सादर केलेले नसेल अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी असे विवरण दिनांक ३० जून, २०१४ किंवा त्यापूर्वी सादर करावे.

(II) <u>त्यानंतर सादर करावयाचे नियतकालिक विवरण</u> :-

शासन सेवेतील प्रथम नियुक्तीच्या वेळी सादर करण्यात आलेल्या विवरणाच्या नंतर प्रत्येक शासकीय अधिकारी/कर्मचारी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) या निर्णयास जोडलेल्या प्रपत्र-१, प्रपत्र-२ व प्रपत्र-३ मध्ये त्याच्या मालमत्तेचे विवरण यापुढे प्रत्येक वर्षी सादर करेल. असे पहिले विवरण दिनांक ३१ मार्च, २०१४ च्या स्थितीस अनुसरुन <u>दिनांक ३० जून, २०१४ पूर्वी सादर करण्यात यावे.</u>

तसेच, यानंतर प्रत्येक वर्षी त्या-त्या वर्षाच्या ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरुन मालमत्तेचे विवरण सोबतच्या प्रपत्र-१, प्रपत्र-२ व प्रपत्र-३ मध्ये विहित नमुन्यात त्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.

२. ही विवरणे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम १९ खालील स्पष्टीकरण (२) मध्ये स्पष्ट केलेल्या विहित प्राधिकाऱ्यांकडे शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पुढीलप्रमाणे सादर करावीत:-

(i) गट-अ च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत, कार्यालय प्रमुख आणि विभाग प्रमुख यांच्याद्वारे शासनाकडे सादर करावीत.

(ii) गट-ब च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत, ज्या कार्यालयात विवरण सादर करण्याच्या वेळी ते काम करीत असतील त्या कार्यालयाच्या प्रमुखांच्या द्वारे विभागप्रमुखांकडे सादर करावीत.

(iii) गट-क च्या कर्मचाऱ्यांनी आपली विवरणे, विवरण सादर करण्याच्या वेळी ते ज्या विभागात/ कार्यालयात काम करीत असतील **कार्यालयाच्या प्रमुखाकडे सादर करावीत.**

३. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी ही विवरणे सीलबंद लिफाफ्यात सादर करावीत. ही विवरणे प्राप्त झाल्यानंतर विहित प्राधिकारी ती स्वत:च्या ताब्यात ठेवील.

४. **विवरणपत्रे सादर न करणे व विलंबाने सादर करण्याचे परिणाम :-**

(अ) या आदेशाप्रमाणे कोणतेही विवरण विहित कालावधीत सादर न केल्यास ती गैरवर्तणूक मानण्यात येईल व अशा गैरवर्तणूकीबद्दल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतूदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

(ब) अशाप्रकारची त्या त्या वर्षाची वार्षिक मालमत्ता विवरणपत्रे सादर केली असणे ही राज्य शासनामधील सर्व टप्प्यांवरील पदोन्नती, आश्वासित योजनेअंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती, विदेश दौरा यासाठी पूर्वअट म्हणून विहित करण्यात येत आहे. परिणामी कोणत्याही अधिकारी/ कर्मचाऱ्यास आश्वासित व नियमित पदोन्नतीचा लाभ देण्यापूर्वी किंवा प्रतिनियुक्तीस अनुमती देण्यापूर्वी तसेच, कार्यालयीन विदेश दौऱ्यास अनुमती देण्यापूर्वी त्याने त्या वर्षाचे ३१ मार्च रोजीचे मालमत्ता विवरणपत्र सादर केले नसल्यास त्यांना पदोन्नती/ आश्वासित योजनेतील पदोन्नती देण्यात येऊ नये व अशी विवरणपत्रे सादर केल्यानंतरच त्यांना पदोन्नती दिली जाईल, असे पहावे. तसेच, असे विवरणपत्र सादर केले नसेल तर त्यास प्रतिनियुक्ती किंवा विदेश दौऱ्यास अनुमती देण्यात येऊ नये.

५. एखाद्या विशिष्ट प्रकरणामध्ये शासकीय कर्मचाऱ्याची सचोटी संशयास्पद आहे आणि/किंवा त्याने त्याच्या ज्ञात उत्पन्नाचा विचार करता, **अपसंपदा साठविली आहे अशी विहित प्राधिकाऱ्याची खात्री झाली** तर अशाप्रकरणी मंजूरी आदेश, प्रतिवेदने इत्यादी अभिलेखाच्या आधारे असा प्राधिकारी कर्मचाऱ्याच्या विवरणाची छाननी केव्हाही करु शकेल आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल चौकशी सुद्धा करुन घेऊ शकेल. चौकशीच्या संदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागास ही विवरणे पाहिजे असतील तेव्हा ती उपलब्ध करुन दिली जातील.

६. सर्व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून (गट-ड मधील कर्मचारी वगळता) नियत दिनांकापर्यंत त्यांचे मत्ता व दायित्व विवरणपत्रे प्राप्त होऊन ती अभिलेखावर ठेवली जातील याची जबाबदारी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांची असेल. प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबतीत त्यांच्या मूळ विभागातील प्राधिकारी (Cadre Controlling Authority) संबंधित मत्ता व दायित्व विवरणपत्रे मिळवून ती अभिलेखावर ठेवण्यास जबाबदार राहतील.

सदर आदेश शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१४०६०२१४५५३४१५०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2014.06.03 12:20:53 +05'30'

(डॉ. भगवान सहाय)
प्रधान सचिव (सेवा)

# मत्ता व दायित्वे विवरण पत्र

## प्रपत्र-१

## अचल मालमत्तेचे विवरण

नियुक्तीच्या.............दिनांकाच्या स्थितीस अनुसरून /दिनांक ३१ मार्च ........... च्या स्थितीस अनुसरून

अधिकारी/कर्मचारी याचे नाव :- पदनाम:-

संवर्ग :- सध्याचे मूळ वेतन :-

| अ. क्र. | अशी मालमत्ता जेथे असेल त्या ठिकाणाचा पोस्टाचा संपूर्ण पत्ता (जिल्हा/ तालुका/ शहर/ गाव ) | अशा मालमत्तेचे नाव व संपूर्ण तपशील (घर/ बंगला सदनिका, जमिन, भाड्याचा संपूर्ण तपशील व क्षेत्रफळ) | अशा मालमत्तेच्या बांधकामाची/ खरेदीची/ जमिन असल्यास तिच्या खरेदीची किंमत (संपादित केल्याचे वर्ष नमूद करावे) | मालमत्तेची सध्याची किंमत | सदर मालमत्ता कोणाच्या नावे आहे ?. स्वत:च्या नावे नसेल तर ज्याच्या/जिच्या नावे आहे त्या व्यक्तीशी शासकीय अधिकारी/ कर्मचारी याचे नाते. | सदर मालमत्ता कशी व कोणाकडून संपादित केली त्याचा तपशील (खरेदी केली, भाडेपट्ट्याने घेतली, गहाणखत करून घेतली, वारसहक्काने/ भेट किंवा अन्य मार्गाने मिळाली.) | मालमत्तेपासून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

वर नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे संपूर्ण सत्य व बिनचूक आहे.

सही :-
नाव :-
पदनाम :-
दिनांक :-

<u>टिपा</u> :-

(१) स्तंभ ५ मध्ये सध्याची अंदाजित किंमत नोंदवावी.

(२) रकाना ७ मध्ये तात्पुरती गहाण किंवा लीजद्वारे मालमत्ता संपादन करण्यात आली असेल ती सुद्धा विचारात घ्यावी. ती लीजद्वारे (भाडेपट्टीद्वारे) संपादन करण्यात आली असेल तर तिचे एकूण वार्षिक भाडे, आणि जर वारसा, भेट किंवा अदलाबदल करुन ती संपादन करण्यात आली असेल तर संपादन केलेल्या मालमत्तेचे अंदाजे मूल्य नमूद करावे.

(३) **<u>हे प्रपत्र प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.</u>**

## मत्ता व दायित्वे विवरण पत्र

### प्रपत्र-२

### चल मालमत्तेचे विवरण

**नियुक्तीच्या.......दिनांकाच्या स्थितीस अनुसरून /दिनांक ३१ मार्च ........ च्या स्थितीस अनुसरून**

**अधिकारी/कर्मचारी याचे नाव :-** **पदनाम:-**

**संवर्ग :-** **सध्याचे मूळ वेतन :-**

| अ. क्र. | चल मालमत्तेचे वर्णन | चल मालमत्तेचा संपूर्ण तपशील (बँक/ पोस्ट ऑफिस, इत्यादिंचे पत्त्यांसह) | खात्यावर असलेली रक्कम/ रोकड सुलभ मत्तेचे दर्शनी मूल्य/ विमा पॉलिसीद्वारे आश्वासित रक्कम/ जडजवाहिर, चांदी किंवा अन्य मौल्यवान धातु, रत्ने व इतर जंगम मालमत्ता संपादन केली त्यावेळचे मूल्य/किंमत | स्वत:च्या नावे नसेल तर ज्या व्यक्तीच्या नावावर आहे त्याचे शासकीय कर्मचाऱ्याशी नाते. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमूद केलेली माहिती माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे संपूर्ण सत्य व बिनचूक आहे.

सही :-

नाव :-

पदनाम :-

दिनांक :-

**<u>टिपा</u> :-**

(१) सदर प्रपत्रात खालील बाबींचा समावेश असावा.

(अ) सर्व रोकड सुलभ मत्ता, जसे रोकड, सर्व प्रकारची बँक खाती, आवर्त ठेव खाती, मुदतबंद ठेवी, कॅश सर्टिफिकेट्स, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी खाती, पोस्ट ऑफिस बचत खाती, पोस्ट ऑफिस मुदतबंद ठेवींची खाती, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, सामाजिक सुरक्षा प्रमाणपत्रे, मुदतीच्या आवर्त ठेवी, शेअर्स, कर्जरोखे, कर्जे इत्यादी सर्व प्रकरणी ठेवींची रक्कम, मूल्य, दर्शनी मूल्य इत्यादी माहिती नमूद करावी.

(आ) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी/अंशदायी भविष्य निर्वाह निधी, जीवन विमा पॉलिसी, पोस्टल विमा पॉलिसी, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतील, अंशदायी भविष्य निर्वाह निधीतील जमा रक्कम व प्रत्येक विमा पॉलिसीद्वारे आश्वासित असलेली रक्कम दर्शविण्यात यावी.

(इ) जडजवाहिर (एकूण मूल्य दर्शवावे)

(ई) चांदी व इतर बहुमोल धातू व जडजवाहिरात मोडत नसलेली मौल्यवान रत्ने (सर्वांचे एकूण मूल्य) आणि,

(उ) इतर चल मालमत्ता जसे की, मोटारगाड्या, स्कुटर्स/मोटार सायकल, रेफ्रिजरेटर, एअरकंडिशनर, रेडिओ/रेडिओग्राम/टी.व्ही.सेट (दूरचित्रवाणी संच) ज्यांची किंमत प्रत्येक प्रकरणी मूळ वेतनाच्या दुपटीपेक्षा जास्त आहे अशा इतर वस्तु (रोजच्या वापरातील कपडे, भांडी, पुस्तके, काच सामान इत्यादी वस्तू वगळून) प्रत्येक वस्तुचे वेगवेगळे मूल्य दर्शविण्यात यावे.

(२) वरील टीप (१) (अ) मध्ये दर्शविलेल्या रोकड सुलभ मत्तेबाबत व टीप (१) (आ) मध्ये दर्शविलेल्या भविष्य निर्वाह निधी/अंशदायी भविष्य निर्वाह निधी आणि विमापत्रे (इन्शुरन्स पॉलिसीज) बाबतचे वर्णन स्तंभ २ मध्ये नमूद करावे. (बँकेचे नाव, पत्ता, पोस्ट ऑफिसचा पत्ता, युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या शाखेचा पत्ता, कंपनी/फर्म/ ऋणको यांचे पत्ते) इ. पूर्ण तपशील स्तंभ ३ मध्ये नमूद करण्यात यावा.

(३) भाडे खरेदी तत्वावर व हप्तेबंदीवर घेतलेल्या वस्तूंच्या पोटी हे विवरण सादर करण्याच्या दिनांकापर्यंत भरलेली रक्कम नमूद करावी.

(४) **<u>हे प्रपत्र प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.</u>**

# मत्ता व दायित्वे विवरण पत्र

## प्रपत्र-३

### दायित्वांचे विवरण

नेयुक्तीच्या............दिनांकाच्या स्थितीस अनुसरून /दिनांक ३१ मार्च ....... च्या स्थितीस अनुसरून

अधिकारी/कर्मचारी याचे नाव :- पदनाम:-

ंवर्ग :- सध्याचे मूळवेतन :-

| अ.क्र. | रक्कम | धनकोचे नाव व पत्ता | दायित्व पत्करल्याचा दिनांक | व्यवहाराचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

वर नमूद केलेली माहिती माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे संपूर्ण सत्य व बिनचूक आहे.

सही :-

नाव :-

पदनाम :-

दिनांक :-

<u>टिपा</u> :-

(१) दोन महिन्यांच्या मूळ वेतनाच्या रकमेपेक्षा अधिक नसणारी प्रत्येक कर्जाची रक्कम नमूद करण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) या विवरणपत्रात वाहन खरेदीसाठी अग्रिम, घरबांधणीसाठी अग्रिम (वेतन अग्रिम आणि प्रवास भत्त्यांचे अग्रिम, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतून घेण्यात आलेली अग्रिमे आणि विमापत्रावर आणि कायम ठेवीवर काढलेले अग्रिम याव्यतिरिक्त) इत्यादी सारख्या शासकीय कर्मचाऱ्याने घेतलेल्या कर्जांच्या अग्रिमांचाही अंतर्भाव करावा.

(३) <u>**हे प्रपत्र प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.**</u>

*****

# निवडसूची

भाग

२४

**निवडसूची**
**बनविण्यासंबंधीचे नियम विहीत करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन.
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०८१/१२५१/सीआर-६/८५/१२,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ जुलै, १९८५.

वाचा :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०७४/दहा,
दिनांक ११ सप्टेंबर १९७५.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०७९/७४०/१२,
दिनांक ७ एप्रिल १९७९

**शासन परिपत्रक**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७४/दहा, दिनांक ११ सप्टेंबर, १९७५ अन्वये शासन सेवेतील पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करण्यासंबंधीच्या नियमांचे प्रारुप विहीत करण्यात आले आहे. या प्रारुप नियमांत वेळोवेळी अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. या सर्व दुरुस्त्यांचे संकलन करुन प्रारुप नियमांत आणखी काही सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परामर्शाने सुधारीत प्रारुप नियमांचा मसुदा तयार करण्यात आला आहे. प्रमाणित मसुदा सोबतच्या जोडपत्रात दिला आहे.

२. प्रत्येक मंत्रालयीन विभागांनी, त्यांच्या नियंत्रणाखालील सेवांमधील/पदांवरील/श्रेणीमधील/ पदोन्नतीसाठी तयार करावयाच्या निवडसूची बद्दलचे नियम तयार करावेत अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक- एसआरव्ही/१०७९/७४०/१२, दिनांक ७ एप्रिल, १९७९ च्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत. मंत्रालयातील सर्व विभागांनी, त्यांच्या नियंत्रणाखालील सेवा / पदां/ श्रेणीवरील पदोन्नतीसाठी, प्रमाणित मसुद्यांतील सुधारित नियमांनुसार निवडसूची तयार करण्यासंबंधीचे नियम सुधारित अथवा नव्याने विहीत करण्याची कार्यवाही करावी.

३. निवडसूची तयार करण्यासंबंधीचे नियम भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये विहीत करावयाचे आहेत. अतएव, त्या नियमांच्या मसुद्यात सामान्य प्रशासन विभागाची, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांच्या संदर्भात लोकसेवा आयोगाची आणि विधी व न्याय विभागाची सहमती मिळविणे आवश्यक आहे. तद्नंतर प्रारुप नियमांस राज्यपालांची अनुमती घ्यावी.

महाराष्ट्र राज्यांचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
( व. अं. कोटेश्वर )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०८१/१२५१/सेवा-६/८५/१२, दिनांक २३ जुलै, १९८५ चे जोडपत्र.

## NOTIFICATION

Department,
Mantralaya, Bombay - 400 032
Dated the

**Constitution of India**

1. To be retained only when any rules or instruments are in force and are required to be superseded.
2. Here mention the name of the post from which the promotion is to be given.
3. Here mention the name of the Department/or office.
4. Here mention the name of the post to which the promotion is to be given.
5. Here mention the post to which the promotion is to be given.
6. Here mention the name of the Department.

No.

In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India 1(and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf) the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules for preparation, maintenance and revision of Select List of the persons holding the post of 2---------------------------- in the 3 ---------------------------Department/ office for the purpose of promotion to the post of 4 -------------------------------------------------------- namely :-

1. Short title - These rules may be called the Select List for promotion to the post of 5------------------- in the 6 ---------------------------------Department (Preparation, Maintenance and Revision Rules, 198

2. Definitions - In these rules, unless the context otherwise requires -

(a) "Commission" means the Maharashtra Public Service Commission.

(b) "Committee" means the Selection Committee constituted under rule 3;

7. Here mention the post from which the promotion is to be given.

8. Here mention the name of the Department or office.

9. Here mention the name of the post with class to which the promotion is to be given.

10. Here mention the name of the Department or office

11. Define the post from which the promotion is to be given.

12. Define the post to which the promotion is to be given. But the definitions should be arranged in alphabetical order.

* The members to be nominated on the Committee shall be not below the rank of the promotional post for which the Select List is to be prepared.

13. Here mention the name of the post with class from which promotion is to be given.

(c) "Government" means the Government of Maharashtra;

(d) "Select List" means a list consisting names of persons holding the posts of 7 ______________ in the 8 ______________ Department/office, who are eligible for promotion to the post of 9 ______________ in the 10 ______________ Department/office and considered fit for promotion in accordance with these Rules;

(e) "11 ______________

(f) "12 ______________".

(g) "Schedule" means the Schedule appended to these rules.

3. **Constitution of Selection Committee.** For the purpose of preparing a Select List there shall be constituted a Selection Committee consisting of not less than three and not more than six members as may be nominated by Government. The members to be so appointed shall not be below the rank of ______________

4. **Meeting of the Committee** - The committee shall ordinarily meet every year in the month of September or in such other month as the Government may be order specify in this behalf to draw up a Select List.

5. **Select List to be prepared annually, etc:-**

(i) The Committee shall consider annually

the claims of all person holding the posts of 13.

eligible for promotion and prepare a Select List of those considered by it to be fit for promotion to the vacancies available for filling by promotion.

(ii) The Select List shall ordinarily be limited to the number of vacancies already existing and those likely to be occur during the following one year.

(iii) The number of persons to be considered for inclusion in the Select List shall be equal to three times the number of vacancies available for promotion if such vacancies do not exceed 25 and in other cases tow times the number of vacancies available for promotion.

(iv) The Select List shall be drawn up having regard to the orders contained in Government Resolutions and Government Circulars mentioned in the Schedule

6. **Manner of preparation of Select List.**

(i) The names of the persons included in the Select List shall ordinarily be arranged in order of seniority in the feeder cadre/posts at the time of such inclusion.

Provided that, the Committee may give any person higher rank in the Select List upto a maximum of six places than that warranted by his seniority if, in the opinion of the committee, such person is considered to be of an outstanding merit.

(ii) The name of an officer, if any, who, on the basis of his confidential record is not considered fully fit for promotion but deserves to be given a trial as a measure of encouragement may be included in the Select List at the place warranted by his seniority in the feeder cadre and an indication of the name having been included on trial may be given. The cases of all such Officers may be reviewed at the preparation of the next Select List with reference to their performance in the higher post during the trial period. If it is found that such Officer has completed the trial period satisfactorily, the original Select List may be finalised without any connotation. If, it is considered that the officer should be continued on trial for another year, his name shall be deleted from the first Select List and entrered at the top of the next Select List with an indication of the element of trial. If it is considered that the Officer is not fit to be continued in the post of promotion, his name shall be deleted and he shall be reverted.

In the event of there being no such cases for review, the earlier Select List shall not be reviewed.

(iii) The cases of all persons who are passed over at any previous revision of the Select List or whose names were deleted from that list shall be considered by the Committee at the subsequent revision thereof, but if such persons are brought on the Select List, they

shall take rank among those who are included in the Select List for the first time.

7. <u>Fixation of seniority in Select List</u> - Subject to the provisions of rule 6, the seniority of persons in the Select List shall be determined by the date of entry of their names in the list.

14 Here maintion the post to which promotion is to be given.

8. <u>Maintenance of Select List</u> -

(i) Persons whose names are brought on the Select List shall ordinarily remain in the list in the same capacity until they are confirmed in the post of 14------------ ---------------------- or retire from Government service.

(ii) The Government may in consultation with the Commission remove names of persons from the Select List if they have subsequently proved themselves to be unfit for continuance on the Select List. The removal of the name from the list shall entail the reversion of the person concerned if he is already officiating in a higher post.

9. <u>Final Select List</u> - The Select List drawn up annually be the Committee shall be forwarded by the Government to the Commission for its advise together with all relevant material including the Confidential records of all the persons whose cases have been reviewed by the Committee and those who are proposed to be included in or omitted from the Select List. The Government shall after taking into consideration the views of the commission, determine the final Select List.

कनिष्ठ पद/ संवर्ग/ सेवामधून वरिष्ठ पद/संवर्ग/
सेवामधील पदोन्नती करताना पाळावयाची तत्वे
निवड समितीने निवडसूची तयार करताना विचारात
घ्यावयाच्या व्यक्तींची संख्या

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय, क्रमांक : एसआरव्ही-१०८९/४०६/प्र.क्र.५/८९/बारा

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक- १ ऑगस्ट,१९८९

वाचा : (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही - १०७५/ ३४२/दहा, दिनांक १ एप्रिल,१९७६

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही - १०७७/ सीआर ३४३/७९/बारा, दिनांक १८ मे,१९८३

**शासन निर्णय**

निवड समितीत सध्या रिक्त असलेल्या आणि पुढील वर्षभराच्या कालावधीत रिक्त होणाऱ्या संभाव्य रिक्त पदांपैकी पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरीता निवडसूची तयार करावयाची असते. पदोन्नतीच्या प्रयोजनासाठी असलेल्या निवड समितीकडून निवडसूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार व्हावा असे अपेक्षित आहे.

२. निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्रात (zone of consideration) असलेल्या व्यक्तींच्या गोपनीय अभिलेखांचे अवलोकन करावे लागते. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७७/ सीआर- ३४३/७९/बारा, दिनांक १८ मे,१९८३ अन्वये निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्र निश्चित करण्याबाबतचे शासनाचे विद्यमान आदेश पुढीलप्रमाणे आहेत :-

"निवड समितीने निवडसूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार करावा यादृष्टीने जेव्हा निवडसूची २५ किंवा कमी नावांची करावयाची असेल तेव्हा निवड समितीच्या विचारार्थ असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या तयार करावयाच्या निवड सूचीच्या तिप्पट संख्येइतकी असावी. जेव्हा निवडसूची २५ पेक्षा अधिक नावांची असेल तेव्हा समितीच्या विचारार्थ अधिकाऱ्यांची संख्या निवडसूचीच्या दुप्पट इतकी असावी."

३. निवडसूची तयार करताना विद्यमान आदेशानुसार विचारार्थ क्षेत्रातील सर्वच उमेदवारांचा विचार करणे आवश्यक नसते. परंतु सर्वांचे गोपनीय अहवाल अद्ययावत करुन/ गोळा करुन निवड समितीच्या सदस्यांना अवलोकनासाठी पाठवावे लागतात, त्यामुळे निवडसूची तयार करायला विलंब होतो. ज्यावेळी २५ टक्के पदावर गुणवत्तेच्या निकषांवर पदोन्नती द्यावयाचे आदेश होते, त्यावेळी मोठया संख्येचे विचारार्थ क्षेत्र आवश्यक होते. शासनाने २५ टक्के गुणवत्तेच्या निकषावर पदोन्नती देण्याचे आदेश मागे

असणाऱ्यांना निवडसूचीमध्ये जास्तीत जास्त ६/२ जागापर्यंतचे वरचे स्थान देता येते. त्यामुळे या विषयाचा सखोल आणि सांगोपांग विचार करुन शासन निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्राच्या व्याप्ती संबंधीच्या विद्यमान आदेशात बदल करुन बिनराखीव पदांकरीता व राखीव पदातील प्रत्येक प्रवर्गाकरीता विचारार्थ क्षेत्र पुढीलप्रमाणे असावे असे आदेश देत आहे .

१. <u>बिनराखीव (सर्वसाधारण प्रवर्ग) पदांकरीता विचारार्थ क्षेत्र</u>

अ) एक ते तीन नावांची निवडसूची करावयाची असल्यास कमीत कमी सहा कर्मचाऱ्यांचा/ अधिकाऱ्यांचा विचार करण्यात यावा.

ब) चार ते दहा नावांची निवडसूची करावयाची असल्यास निवडसूचीच्या आकाराच्या दुप्पट संख्येइतक्या कर्मचाऱ्यांचा/ अधिकाऱ्यांचा विचार करण्यात यावा.

क) दहापेक्षा जास्त नावांची निवडसूची करावयाची असेल तर निवडसूचीच्या आकाराच्या दीडपट संख्येइतक्या किंवा वीस यापैकी जास्त असेल त्या संख्येइतक्या कर्मचाऱ्यांचा/ अधिकाऱ्यांचा विचार करण्यात यावा.

२. <u>राखीव (अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग) पदांकरीता विचारार्थ क्षेत्र</u>

वर्ग-३ ते वर्ग-१ मधील पहिल्या पदांपर्यंतच्या पदांवर पदोन्नती देताना ५० बिंदू रोस्टरनुसार प्रत्येक मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी/अधिकाऱ्यांसाठी जितकी राखीव पदे असतील त्या राखीव पदाच्या संख्येस अनुसरुन वरील भाग (१) मधील (अ),(ब) आणि (क) मध्ये नमूद केलेल्या संख्येइतक्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचा/ अधिकाऱ्यांचा देखील विचार करण्यात यावा.

<u>टिप</u> :- मागासवर्गीयाकरिता राखीव असलेले पद अथवा पदे आरक्षणमुक्त करण्याचे शासनाचे आदेश झाल्यास त्या प्रमाणात वरील भाग (१) मधील विचारार्थ क्षेत्र वाढून भाग (२) मधील विचारार्थ क्षेत्र कमी होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(भा.म.भणगे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**गट अ व गट ब (राजपत्रित) पदांवर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ फेब्रुवारी, २०११.

वाचा: शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.५/०५/१२, दि.२६.६.२००६.

**<u>शासन परिपत्रक</u>**

प्रचलित कार्यपद्धतीनुसार शासन सेवेतील गट-अ मधील (असुधारित वे.श्रे.रु.१२०००-१६५०० व त्यापेक्षा कमी दर्जाच्या) आणि गट-ब (राजपत्रित) मधील पदांवर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग कार्या.१२ व कार्या.१६-ब कडून तपासण्यात येतात. असे प्रस्ताव ब-याच वेळेस प्रशासकीय विभागाकडून योग्यप्रकारे सादर केले जात नसल्याचे व प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे सादर केली नसल्याचे आढळून येते. संबंधित मुद्यांच्या पूर्ततेसाठी व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करण्याकरीता नस्ती प्रशासकीय विभागास परत करावी लागते. तसेच असे प्रस्ताव प्रथम कार्या.१२ कडून तपासून आरक्षणासंदर्भात कार्या.१६-ब कडे पाठविण्यात येतात. तथापि संबंधित निवडसूचीतील पदांचे आरक्षण विभागाने योग्य प्रकारे केले नसल्यास आरक्षणासंबंधीच्या मुद्यांची पूर्तता करण्यासाठी कार्या.१६-ब कडून प्रस्ताव विभागास परत करण्यात येतो. तसेच विभागाने नमूद केलेल्या आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्यामुळे निवडसूचीतही बदल संभवतो. अशा परिस्थितीत निवडसूची योग्यप्रकारे अंतिम होण्यासाठी प्रस्ताव कार्या.१२ कडून पून्हा तपासणे आवश्यक ठरते. सबब निवडसूचीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागात दोन कार्यासनांमध्ये वारंवार तपासावा लागतो. परीणामी निवडसूची अंतिम होण्यास व पदोन्नतीने पदे भरण्यामध्ये जास्त कालावधी लागतो.

२. वरीलपमाणे परिस्थिती उदभवू नये व निवडसूचीचे प्रस्ताव लवकरात लवकर कार्या.१२ कडून तसेच कार्या.१६-ब कडून (प्रत्येकी) शक्यतो १० (कार्यालयीन कामकाजाच्या) दिवसाच्या कालावधीत अंतिम व्हावेत या दृष्टीने कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.:-

(१) निवडसूची/तदर्थ, पदोन्नतीसूचीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागीय पदोन्नती समितीच्या (निवडसमितीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तात या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व बाबीचा तपशील नमूद करण्यात यावा.

या आदेशापुर्वी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व बाबीचा तपशील बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद केला नसल्यास सदर तपशील स्वतंत्र प्रपत्रात सादर करण्यात यावा.

(२) निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास मान्यतेसाठी पाठविताना या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "ब" मधील सर्व कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

(३) आरक्षणासंदर्भात कार्या.१६-ब ने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार आवश्यक कागदपत्रे, तपशील सादर करण्यात यावा.

(४) निवडसूचीसाठी उपलब्ध पदांचे आरक्षण तपासण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीपुर्वीच बिंदूनामावलीसह प्रस्ताव प्रथम सामान्य प्रशासन विभाग/कार्या.१६-ब कडे सादर करण्यात यावा. कार्या.१६-ब कडून आरक्षण प्रमाणित करुन झाल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात यावी. कार्या.१६-ब ने प्रमाणित केलेले आरक्षण व अन्य आवश्यक बाबी विचारात घेऊन निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची तयार करण्यात यावी. विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूचीस मान्यतेचा प्रस्ताव कार्या.१२ कडे सादर करण्यात यावा. कार्या.१२ कडून प्रस्ताव तपासून तो विभागास परत करण्यात येईल. मात्र आरक्षणाबाबत काही विशिष्ट मुद्दा उपस्थित होत असल्यासच त्यासंदर्भात अथवा मागासवर्गीय अधिकारी/कर्मचा-याचे गोपनीय अहवालानुसार अधिक्रमण होत असल्यास (अपात्र होत असल्यास) त्याअनुषंगाने प्रस्ताव कार्या.१६-ब कडे पाठविण्यात येईल.

(५) तदर्थ पदोन्नतीसूचीसाठी (नामनिर्देशनाच्या कोटयातील पदांवर तदर्थ स्वरुपात पदोन्नती द्यावयाची असल्यास) सदर पदांकरीता आयोगाकडे मागणीपत्र सादर केल्याचा तपशिल यामध्ये किती पदांकरिता, केव्हा मागणीपत्र पाठविले, मागणीपत्रात आयोगाने त्रुटी काढल्या आहेत काय? आयोगाने जाहिरात दिली आहे काय? मागणीपत्राबाबत आयोगाकडून झालेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती, आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होण्यास अपेक्षित कालावधी याचा समावेश असावा.

(६) प्रस्ताव सादर करताना पूर्वीच्या निवडसूचीस आयोगाची मान्यता घेतली आहे वा कसे त्याचा उल्लेख करुन मागील निवडसूचीच्या प्रस्तावावर सा.प्र.वि. ने काही विशिष्ट बाबींची पुर्तता करण्याचे अभिप्राय दिले असल्यास त्यानुसार पूर्तता करुन प्रस्ताव सादर करावा.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी या निदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच त्यांच्या अधिपत्याखालील ज्या विभागप्रमुखांकडून निवडसूचीचे प्रस्ताव सादर होत असतील त्या विभागप्रमुखांना या निदेशांचे पालन करण्याबाबत कळविण्यात यावे. यानुसार विभागप्रमुखांनी प्रस्ताव योग्यप्रकारे सादर केला आहे काय हे प्रशासकीय विभागाने तपासणे आवश्यक राहील. या परिपत्रकातील निदेशानुसार व सोबतच्या परिशिष्ट "अ" व "ब" नुसार

**शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि. २४ फेब्रुवारी २०११ सोबतचे**

**परिशिष्ट "ब"**

**(निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करताना**

**सोबत सादर करावयाचे कागदपत्र)**

१) सेवा प्रवेश नियमाची प्रत, त्यामध्ये सुधारणा केली असल्यास त्याची प्रत.

२) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या संवर्गाची प्रसिध्द केलेली अद्ययावत ज्येष्ठतासूची. ही ज्येष्ठतासूची योग्य असल्याचे संबंधित सचिव व सह सचिव/उपसचिव यांनी प्रमाणित करणे. या ज्येष्ठतासूचीतील जे अधिकारी/कर्मचारी पूर्वीच सेवानिवृत्त, पदोन्नत, निधन झाले असतील वा राजीनामा दिला आहे, त्याची नोंद करणे तसेच ज्येष्ठतासूचीसंदर्भात न्यायालयीन प्रकरण सुरु असल्यास त्याची सद्यस्थिती नमूद करणे.

३) विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनी स्वाक्षरीत केलेले कार्यवृत्त.

४) विभागीय पदोन्नती समितीने अपात्र ठरविलेल्या अधिकारी/कर्मचा-यांची गोपनीय अहवाल नस्ती. संबंधितांना प्रतिकूल शेरे अथवा पदोन्नतीच्या पात्रतेपर्यन्त न येणारे शेरे कळविल्याची नस्तीमधील ज्ञापने ठेवण्यात यावीत.

५) पदोन्नती नाकारल्याने पदोन्नतीसाठी विचार न झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांचा त्यासंबंधीचा अर्ज. पदोन्नती कायमस्वरुपी नाकारली किंवा किती कालावधीकरीता नाकारली याचा स्पष्ट उल्लेख अर्जात असावा. याबाबत उल्लेख नसल्यास ते स्पष्ट करुन घ्यावे.

११) पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील व निकष पूर्ण करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नांवे व ज्येष्ठताक्रमांक, विभागीय चौकशी सुरु असल्यास त्याचा, जातवैधता प्रमाणपत्र सादर केला आहे वा कसे याचा तपशिल.

१२) अधिकारी/कर्मचाऱ्यांचा निलंबन, शिक्षा वा अन्य कारणास्तव विचार झाला नसेल त्याबाबतचा तपशील, विभागीय चौकशीअंती शिक्षा दिली असल्यास शिक्षेचे स्वरुप, आदेशाचा दिनांक व शिक्षा सुरु होण्याचा दिनांक.

१३) पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची विभागीय पदोन्नती समितीमधील अध्यक्ष व सदस्यांनी स्वतंत्रपणे (अथवा एकत्रित) केलेली प्रतवारी व सरासरी प्रतवारी व केलेली (पात्र/अपात्र) शिफारस याचे विवरणपत्र (यामध्ये अधिकारी/कर्मचारी यांची नांवे, त्यांचा प्रवर्ग, ज्येष्ठता क्रमांक, पदोन्नतीसाठी पात्रता इ. तपशिल ) तसेच मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी गोपनीय अहवालाची प्रतवारी धारण करत नसल्यास अपात्र ठरविताना त्याचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन तसा विचार केल्याचे नमूद करावे. तसेच गोपनीय अहवालानुसार अपात्र ठरविलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे/ पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत न येणारे शेरे कळविले असल्याचे नमूद करावे.

१४) समितीने शिफारस केलेली निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची. (निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूचीकरीता वरील अ.क्र.६ नुसार उपलब्ध पदांच्या मर्यादेत निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची असावी.) निवडसूची /तदर्थ पदोन्नतीसूची यामध्ये अधिकारी/कर्मचा-यांची नावे, ज्येष्ठता क्रमांक, प्रवर्ग तसेच एकापेक्षा अधिक संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी असल्यास त्यांचे पद याचा उल्लेख करावा. तसेच निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची आपसातील ज्येष्ठताक्रमानुसार आहे याची दक्षता घ्यावी.

**१५) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ८.६.२०१० नुसार संबंधित संवर्गास विभागीय संवर्ग वाटप नियमावली लागू आहे वा कसे ते नमूद करावे व ही नियमावली लागू असल्यास विभागीय संवर्गनिहाय रिक्त पदांची विगतवारी नमूद करावी.**

**शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि. २४ फेब्रुवारी २०११ सोबतचे**

**परिशिष्ट "अ"**

(विभागीय पदोन्नती समितीच्या/निवडसमितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद करावयाच्या बाबी)

१) मंजूर आकृतीबंधानुसार संबंधित संवर्गाची मंजूर पदसंख्या आणि आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर पदसंख्येत वाढ किंवा घट झाली असल्यास त्याची माहिती.

२) पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड पे) व गट

३) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदाचे पदनाम व वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड पे.)

४) सेवा प्रवेश नियमानुसार भरतीचे मार्ग (पदोन्नती,नामनिर्देशन, इ.) व त्याचे प्रमाण तसेच पदोन्नतीकरिता एका पेक्षा अधिक निम्न संवर्ग असल्यास त्या संवर्गातून पदोन्नतीकरिता प्रमाण.

५) निवडसूचीचे वर्ष (सर्वसाधारणपणे १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट)

६) मंजूर पदसंख्येनुसार पदोन्नती कोटयात येणारी पदे व त्यापैकी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकास रिक्त असलेली व निवडसूची वर्षातील संभाव्य रिक्त पदे. (कोणत्या दिनाकापर्यंतची संभाव्य रिक्त पदे विचारात घेतली आहेत ते नमूद करावे.)

७) सेवा प्रवेश नियमात पदोन्नतीकरिता विहित केलेला निम्न संवर्गात नियमित सेवेचा निकष अथवा सेवा प्रवेश नियमात याबाबत तरतूद नसल्यास सा.प्र.वि. च्या आदेशानुसार किमान ३ वर्षे नियमित सेवेचा निकष तसेच सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता विहित केली असल्यास सदर निकष पूर्ण करतात वा कसे.

८) आधीच्या वर्षामध्ये संबंधित संवर्गातील नामनिर्देशनाच्या (सरळसेवा) कोटयातील पदावर तदर्थ पदोन्नती दिली असल्यास, उपलब्ध प्रवर्गनिहाय पदांवर त्यांची पदोन्नती नियमित होण्यासाठी त्यांचा निवडसूचीत समावेशनाचा विचार केला आहे काय. (तदर्थ पदोन्नती दिली नसल्यास, तसे प्रमाणित करणे).

९) बिंदूनामावलीनुसार मागासवर्गीयांच्या प्रत्येक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांचा (अनुशेषासह) कार्यासन १६ ब ने प्रमाणित केलेला तपशील (आरक्षणाचा तपशील).

१०) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या संवर्गाची विचारात घेतलेली ज्येष्ठतासूची. (कोणत्या वर्षापर्यंतची आहे.)

पूर्तता केली नसल्यास निवडसूचीचा प्रस्ताव तपासण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध केले असून त्याचा संगणक संकेतांक २०११०२२४१८४६३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्री. प्र. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

# पदोन्नती

भाग २५

**Administrative Reorganisation Committee's Recommendation Ratio between promotees and nominee's Direct Recruitment of graduates in Class III Service.**

Government Of Maharashtra
General Administration Department
Circular No.SRV-1069-D
Sachivalaya, Bombay-32 (BR), Dated the 26th March 1970.
5 Chaitra, 1991.

## CIRCULAR

. The Administrative Reorganisation Committee has recommended to Government that in order to maintain a proper balance between direct recruitment and promotion to posts in Class-I and Class-II services, where the proportion of direct recruits prescribed at present is less than 50%, it should be raised to that level. It has also recommended that in the case of those Class-I and Class-II services for which no proportion of direct recruits and promotees has been fixed at present, it should be laid down that 50% of posts should be filled by direct recruitment. Government has accepted these recommendation and is accordingly pleased to direct that all departments of the secretariat should take a review of the existing ratio prescribed for direct recruitment on promotion prescribed for the posts in Class-I and Class-II services under their administrative control and to amend, wherever necessary, the existing providence in recruitment rules in consultation with the General Administration Department and the Maharashtra Public Service Commission, so as to conform to the recommendation of the Administrative Reorganisation Committee accepted by Government.

2. Another recommendation of the Administrative Reorganisations Committee is that, it is necessary to make provision for direct recruitment at the subordinate levels of every departmental hierarchy and in particular to provide for direct recruitment of graduates in the offices of the Heads of Departments and to the posts of Aval Karkuns in the Revenue Administration. The proportion of such direct recruitment at subordinate levels may be fixed at 25%. Government has accepted this recommendation also and is accordingly pleased to direct that all Departments of the Secretariat should take a necessary steps to examine the various subordinate cadres in the offices of the Heads of Departments under their control and make a provision in the relevant recruitment rules for direct recruitment of graduates at suitable levels in consultation with General Administration Department.

By order and in the name of Governor of Maharashtra.

Sd/-
S.M.PISAL
Under Secretary to the Government of Maharashtra.
General Administration Department

Promotions

Constitution of Departmental Promotion Committees for considering cases of a-

GOVERNMENT OF MAHARASHTRA
General Administration Department,
Circular No. SRV-1076-X,
Sachivalaya, Bombay-400 032.
Dated the 16th March, 1976.

CIRCULAR

According to the principles governing the preparation and revision of select lists for promotion from a lower to a higher grade, post or Service, a regular selection Committee is to be constituted for preparing such select lists. The consideration underlying this provision was that a select list prepared by a Committee would reflect greater objectivity than one prepared on the basis of the recommendations of individual Heads of Departments or Offices.

2. It is possible that the procedure for preparing regular select lists is not being followed in the case of Departments or Services in which promotions occur infrequently and in relatively small numbers. Even in such cases, however, it is necessary to see that the actual selection of candidates for promotion is made by a departmental promotion committee comprising three or more officers of appropriate rank. All Departments of the Secretariat and all Heads of Departments are accordingly requested to see that, where departmental promotion committees have not been constituted already, such committees are constituted immediately to regulate all cases of promotion within their respective jurisdiction. They are further requested to see that an officer belonging to one of the backward classes, if available, is appointed as a member of each such Committee.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Sd/-
(K.P.Nadkarni)
Joint Secretary to Government.

**Promotion**
Procedure to the followed in The cases of persons whose conduct as under investigation or against whom departmental enquiries are pending :-

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,**
Circular No. SRV-1075/X,
Sachivalaya, Bombay-400 032.
Dated the **2nd April 1976.**

**CIRCULAR OF GOVERNMENT**

According to the existing practice, Government servants whose conduct is under investigation or against whom a departmental enquiry is pending, are ordinarily not considered for promotion. This practice is however, likely to cause hard-ship in the case of Government servants who are otherwise fit for promotion and the charges against whom may not be so serious as to disqualify them for provisional promotion during the pendency of the investigation or enquiry. The question has been examined. There are three stages at which action will have to be taken viz.

1. The stage of preparing the select list.
2. Interim promotion during the pendency of the proceedings, and
3. The final action to be taken after the conclusion of the investigations and the departmental enquiry if any.

Action as below should be taken in respect of these three stages.

2. The Stage of preparation of select list :

(a) At the time of drawing up of the select list, the case of a person facing an investigation or departmental enquiry should be considered in the same manner in which the cases of other person are considered i.e. On the basis of his previous record of service. If on the basis of his record. He is found fit for promotion, his name should be included in the select list at the appropriate place; but this inclusion should be considered to the purely provisional to be reviewed after the conclusion of the departmental enquiry or investigation if on conclusion of the investigation it is decided that a departmental enquiry is not necessary. This position will apply to all persons irrespective of whether they are under suspension or not.

(b) If the state of his record is such that because of his suspension, his record for the past 2/3 years is not available and so no decision either way can be taken then the Selection Committee should keep his case 'open' i.e. to be considered at the later date without prejudice to him because of the delay.

(c) If, on the basis of his record, he is not found fit for promotion, no further question arises.

3. Interim promotion during the pendency of the proceedings

If the person is found fit and his name is provisionally included in the select list;

(a) During the pendency of the proceedings, the question of promoting a person under suspension does not arises such a person shall not be promoted.

(b) In respect of a person who is not under suspension, the competent authority should take a conscious decision, after taking into consideration the nature of the charges levelled whether the person should be promoted without waiting for the conclusion of the enquiry. If it is decided that he should be so promoted such promotion will provisional and will be reviewed on the conclusion of the investigation or enquiry.

4. <u>On conclusion of the investigations and/ or departmental enquiry :</u>

(a) If a person is completely exonerated the following consequences should follows :

(i) If he was provisionally promoted, his provisional promotion should be treated as regular.

(ii) If such a person had become due for promotion but was not promoted, he should be promoted at the first opportunity. He should retain the seniority of his position in the select list. His pay should also be fixed at a stage which he would have reached had he been actually promoted according to his rank in the select list, but he should not be entitled to any arrears of pay on this account.

(b) If he is not completely exonerated, then his case should be re-examine and a fresh decision should be taken as to whether, in view of the result of the investigations of enquiry, he is fit to be promoted;

(i) If he is not found fit in such a re-examination and if he was provisionally promoted earlier the provisional promotion should come to an end. If he was not so promoted, no further question arises.

(ii) If he is found fit, the competent authority should indicate his revised place in the Select List. This revised place is expected to be lower than the original provisional place in most cases because of the interesulting from the proceedings. If such a person was already provisionally promoted earlier, he should be deemed to be promoted accordingly to his revised position in the select list and the period his earlier promotion should be treated as fortuitous. If such a person was not already promoted, he should be promoted according to his revised position in the select list and the same consequence as in clause (a) (ii) above should follow.

(c) Cases which are kept 'Open should be decided expeditiously.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Sd/-
(K.P. Nadkarni)
Joint Secretary to Government.

पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम
व त्याबाबत अवलंबिण्याची कार्यवाही-

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-एसआरव्ही-१०८७/११३१/प्र.क्र. ११-८९/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक-३० एप्रिल, १९९१.

शासन निर्णय :-

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही वेळा शासकीय सेवकांना पदोन्नती देण्याचे आदेश निर्गमित झाल्यावर पदोन्नती दिलेले सेवक, पदोन्नतीने दिलेली नेमणूक त्याच ठिकाणी असो अथवा अन्य ठिकाणी असो, त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना/नेमणूक मिळेपर्यंत पदोन्नती नाकारतात. काही वेळा पदोन्नती साफ नाकारुन खालच्याच पदावर राहण्याची संबंधित अधिकाऱ्यांकडून इच्छा दर्शविली जाते. शासनास जेथे अधिक चांगल्या व कार्यक्षम सेवकांची नेमणूक करावयाची असते, अशा शहरं, दुर्गम किंवा आदिवासी प्रदेशासारख्या ठिकाणी अशा अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नेमणूक केल्यानंतर ती पदोन्नती नाकारण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. सेवकाने पदोन्नती नाकारल्यामुळे प्रशासकीय अडचणी/विलंब होतात; शिवाय आपल्या पसंतीचे पदोन्नतीचे ठिकाण/जागा/पद मिळविण्यासाठी प्रयत्न/प्रतीक्षा करण्याची वृत्ती वाढीस लागते. या सर्व बाबींचा विचार करुन शासकीय सेवकांनी पदोन्नती नाकारल्यास त्या प्रकरणी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी असे आदेश शासन देत आहे:-

"वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर एखाद्या सेवकाने पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दर्शविल्यास त्याचे नांव पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या सेवकांच्या निवडयादीतून काढून टाकण्यात यावे. पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड यादी त्यानंतर जेव्हा बनविण्यात येईल, त्या वेळी त्या कर्मचाऱ्याच्या प्रकरणाचा गुणवत्तेप्रमाणे पुन्हा विचार करावा."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भा. म. आगे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सेवाप्रवेश नियम
पदोन्नतीसाठी पूर्वअट म्हणून निम्न संवर्गात किमान सेवेसंबंधीची अट
परिविक्षाधीन कालावधीतील सेवा अनुभवासाठी ग्राह्य धरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्र.एसआरव्ही-१०९१/प्र.क्र.१/९१/बारा,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ मे,१९९४.

पहा:- १) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०८८/१०९/१२,दि.२५ ऑगस्ट,१९८८.
२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०८८/१०९/१२,दि.३१ मे ,१९८९.
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०८८/१०९/प्र.क्र.१/८८/१२, दि.४-९-१९९०.
४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.७३ (अे)(७)/९८९/दोन, दि.२५-१-९४ चे पत्र.

शासन निर्णय :-

शासन सेवेतील वर्ग-३ (आता गट क) मधील वरिष्ठ पदावर वर्ग-२ (गट ब) मधील वरिष्ठ पदावर आणि वर्ग-१ (गट अ) मधील दुसऱ्या पदोन्नतीच्या पदांपर्यन्त पदोन्नती करताना निम्न पदावर ३ वर्षे नियमित सेवेच्या अनुभवाची अट विहित केली आहे. उपरोक्त क्र.(३) येथे दर्शविलेल्या परिपत्रकानुसार परिविक्षाधीन काळातील सेवेचा कालावधी पदोन्नतीसाठीच्या अनुभव कालावधीच्या गणतीसाठी नियमित सेवा कालावधी म्हणून ग्राह्य समजण्यात यावा किंवा कसे याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या प्रश्नाबाबत सर्वकष तपासणी केल्यानंतर असा निष्कर्ष आहे की, परिविक्षा कालावधी हा उमेदवार ज्या सेवेत प्रविष्ठ झालेला आहे त्या सेवेंअंतर्गत प्रशिक्षणाचा कालावधी म्हणून समजण्यात येतो. या कालावधीमध्ये अशा उमेदवारांना संबंधित पदांच्या कामकाजाचे ज्ञान,त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समजावून घेणे अपेक्षित असते. तसेच त्यास विहित केलेल्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीतील नेमणूक अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही. तेव्हा शासनाचे असे आदेश आहेत की, ज्या अधिकाऱ्यांची नेमणूक परिविक्षाधीन कालावधीतील आहे. त्यांच्या बाबतीत परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केल्यानंतरच त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा. जोपर्यन्त त्यांची नियुक्ती परिविक्षाधीन तत्वावर दोन वर्षे किंवा वाढीव कालावधीकरिता चालू राहिलेली असेल तो कालावधी पदोन्नतीसाठी निश्चित केलेल्या अनुभव कालावधीसाठी ग्राह्य धरण्यात येऊ नये. परिविक्षाधीन कालावधी समाप्त केल्यानंतर त्या तारखेपासून पदोन्नतीसाठी अनुभव कालावधी गणण्यात यावा. या नेमणूकीच्या दिनांकापासून सेवाप्रवेश नियमानुसार विहित केलेला अथवा वर (क्र.१) येथील परिपत्रकात नमूद केलेला आवश्यक कालावधी पूर्ण होईपर्यन्त संबंधित अधिकारी वरच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात येऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-

( य. मा. जोशी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

पदोन्नती

विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असताना शासकीय सेवकास दिलेल्या पदोन्नतीचे नियमन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.२९/९५/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २२ एप्रिल, १९९६.

वाचा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५/१०, दिनांक २ एप्रिल, १९७६.

**शासन निर्णय**

विभागीय चौकशी प्रलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचारी हयांच्या पदोन्नतीसाठी विचार करताना काय कार्यपध्दती अवलंबिली जावी, हया संबंधात सविस्तर सूचना उपरोलिखित परिपत्रकान्वये विहित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विभागीय चौकशी प्रलंबित असतानाही, ज्येष्ठताक्रमानुसार विचारक्षेत्रात येणारे अधिकारी / कर्मचारी पदोन्नतीस पात्र असल्याचे, निवडसमितीस आढळल्यास अशा अधिकारी / कर्मचारी हयांचा निवडसूचीत तात्पुरत्या स्वरुपात समावेश केला जातो व नंतर, पदोन्नती आदेशित करण्यास सक्षम असणाऱ्या अधिकाऱ्याने अशा दोषारोपांचे स्वरुप लक्षात घेवून, त्यास चौकशीच्या निर्णयाची वाट न पहाता तात्पुरती पदोन्नती द्यावयाची काय हयाबाबत जाणीपूर्वक निर्णय घ्यावयाचा असतो,

(ब) विभागीय चौकशी नंतर, अधिकारी / कर्मचारी हयास दोषमुक्त ठरविल्यास, ओघानेच त्याची तात्पुरती पदोन्नती नियमित केली जाते. परंतु, अधिकारी / कर्मचारी हयांचे विरुध्दचे आरोप सिध्द होऊन, त्यास काही शिक्षा झाली तर शिक्षेची अंमलबजावणी करण्याकरिता त्याची तात्पुरती पदोन्नती संपुष्टात येते.

हयासंबंधात, शासनाच्या असे निदर्शनास आले की, दीर्घकाळ चाललेल्या चौकशीच्या प्रक्रियेनंतर, अपचारी अधिकारी / कर्मचारी हयांस वेतनवाढ/वाढी, रोखण्याची सौम्य शिक्षा झाल्यावर, ही शिक्षा भोगण्यासाठी अधिकारी / कर्मचारी हयास, निम्न पदावर पदावनत करणे जाचक ठरते, म्हणून हया सर्व बाबींचा काळजीपूर्वक विचार करुन शासन असे आदेश देत आहे की,

(१) विभागीय चौकशी प्रलंबित असतानाही , जाणीवपूर्वक निर्णय घेऊन तात्पुरते पदोन्नत करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी हयास चौकशीनंतरच्या निर्णयानुसार वेतनवाढ /वाढी रोखण्याची सौम्य शिक्षा झाल्यास, शिक्षा भोगण्यासाठी, त्यास निम्न पदावर, पदावनत करण्याची आवश्यकता नाही. वेतनवाढ /वाढी रोखण्याच्या शिक्षेची अंमलबजावणी पदोन्नतीच्या उच्च पदावरच करण्यात यावी. मात्र त्यासाठी त्याची , त्याची उच्च पदावर शिक्षा भोगण्यास तयारी असल्याची लेखी पूर्वसंमती घेण्यात यावी . जर त्याने लेखी संमती देण्याचे नाकारल्यास, त्यास निम्न पदावर पदावनत करुन त्या पदावर शिक्षेची अंमलबजावणी केली जावी व शिक्षेचा कालावधी पूर्ण होईपर्यन्त त्यास पदोन्नती दिली जाऊ नये .

(२) ज्या प्रकरणी पदोन्नती रोखण्याची शिक्षा देण्यात आली असेल, अशा अपचारी अधिकारी / कर्मचारी हयास ताबडतोब मूळ पदावर पदावनत करण्यात यावे .

हे आदेश दिनांक १ जानेवारी , १९९५ पासून अंमलात येतील .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के.सी.श्रीवास्तव
प्रधान सचिव (सेवा)

**सेवा प्रवेश नियम**

**पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/ श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करणे**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-२००५/प्र.क्र.१/२००५/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-२५ फेब्रुवारी,२००५.

पहा :- (१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१२७७/१२,दिनांक १४ ऑक्टोबर,१९७७.
(२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१२७७/१२, दिनांक ३ सप्टेंबर,१९७९.
(३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०८०/१२, दिनांक २० जुलै,१९८१.
(४) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/१२,दिनांक २५ ऑगस्ट,१९८८.
(५) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक ३१ मे,१९८९.
(६) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/प्र.क्र.१/८८/१२,दि.४सप्टेंबर,१९९०

**परिपत्रक**

वर नमूद केलेल्या संदर्भाधिन क्र.३, ४, ५ व ६ येथील परिपत्रकानुसार गट "क" पासून गट "अ" मधील दुसऱ्या टप्प्यापर्यन्तच्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर तीन वर्षाच्या किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करण्यात आली होती आणि गट "अ" मधील दुसऱ्या टप्प्यानंतरच्या पदावरील प्रत्येक टप्प्यावरील पदोन्नत्याकरिता कोणताही अनुभवाचा कालावधी विहीत केलेला नव्हता. सदर आदेश अधिक्रमित करुन शासन आता असे आदेश देत आहे की, गट "क"(वर्ग-३) पासून गट "अ" (वर्ग-१) मधील सर्व टप्प्यापर्यन्तच्या आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून राहील.

२. वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती तरतुद मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील सर्व पदांच्या सेवाप्रवेश नियमात अंतर्भूत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी आणि अशा प्रकारे सेवाप्रवेश नियमात सुधारणा होईपर्यन्तच्या कालावधीपर्यन्त पदोन्नती करताना या तत्वाचा अवलंब करावा.

३. ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीसाठी अनुभवाचा कालावधी वरील सुधारीत अनुभवाच्या कालावधीपेक्षा विविक्षित कारणास्तव जास्त वर्षे विहित केला असेल तर त्या पदांच्या बाबतीत हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**बा.बा.नारायणकर**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**अपंग अधिकारी / कर्मचाऱ्यांचा अनारक्षित पदांवर पदोन्नतीसाठी विचार करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२९८/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७.१०.२०११

वाचा : केंद्र शासनाच्या कार्मिक, लोकशिकायत व निवृत्तीवेतने मंत्रालयाचे (Ministry of Personnel, Public Grivevences and Pensions) कार्यालयीन ज्ञापन क्र.३६०३५/४/२०१०-इएसटीटी (आरइएस), दि.१.८.२०११.

**परिपत्रक**

शासन सेवेत गट 'अ', गट 'ब', गट 'क' व गट 'ड' पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी अपंगांना ३% आरक्षण विहित केले आहे. तसेच सरळसेवेने नियुक्तीसाठीचे प्रमाण ७५% पेक्षा कमी आहे अशा गट 'क' व गट 'ड' मधील पदांवर पदोन्नतीने नियुक्तीसाठी अपंगांना ३% आरक्षण विहित केले आहे. सदर ३ % आरक्षणांतर्गत अपंगांच्या विविध प्रवर्गासाठी पदे निश्चित करण्याबाबत (identify) आदेश दिले आहेत. यानुसार अपंगांसाठीची राखीव पदे विविध प्रवर्गासाठी निश्चित करण्याबाबत प्रशासकीय विभागांकडून कार्यवाही करण्यात येते.

२. गट 'अ', गट 'ब' मधील पदांवर पदोन्नतीसाठी अपंगांना आरक्षण नाही या कारणास्तव, गट 'अ', गट 'ब' पदांवर पदोन्नतीसाठी अपंग व्यक्तींचा विचार होत नसल्याचे निदर्शनास आल्याने, केंद्र शासनाने, "गट 'अ' व गट 'ब' ची जी पदे अपंगांच्या विशिष्ट प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आली आहेत, त्या पदांवर पदोन्नती देताना, निम्न संवर्गात (feeder cadre मध्ये) अपंगांच्या संबंधित प्रवर्गातील व्यक्ती कार्यरत असल्यास, पदोन्नतीकरीता अन्य व्यक्तींसाठी लावलेले निकष त्यांनाही लावून त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा" असे निदेश संदर्भाधीन दि.१.८.२०११ च्या ज्ञापनान्वये दिले आहेत.

३. राज्य शासकीय पदांवर पदोन्नतीसाठी यथास्थिती "ज्येष्ठता अधीन पात्रता", "ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता" हा निकष विहित केला आहे. गट 'अ', गट 'ब' (राजपत्रित) पदांवर पदोन्नतीसाठी या निकषाच्या आधारे यथास्थिती विभागीय पदोन्नती समितीकडून / आस्थापना मंडळाकडून तपासणी होते. तथापि केंद्र शासनाच्या वरील आदेशातील सूचना राज्य शासनाने अंमलात आणण्याचे निदेश मा.उच्च न्यायालयाने "रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका" मधील अंतरीम सुनावणीत दिले आहेत. त्यानुसार केंद्र शासनाचे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. मा.उच्च न्यायालयाच्या निदेशास अनुसरुन, सर्व प्रशासकीय विभागांना व विभागप्रमुखांना याद्वारे कळविण्यात येते की, गट 'अ' व गट 'ब' ची जी पदे अपंगांच्या विशिष्ट प्रवर्गासाठी निश्चित (identify) करण्यात आली आहेत, त्या पदांवर पदोन्नती देताना, निम्न संवर्गात (feeder cadre मध्ये) अपंगांच्या संबंधित प्रवर्गातील व्यक्ती कार्यरत असल्यास, पदोन्नतीकरीता अन्य व्यक्तींसाठी लावलेले निकष, या अपंग व्यक्तींना लावून पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा. या

केंद्र शासनाने संदर्भाधीन ज्ञापनान्वये दिलेल्या निदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. आणि गट-अ व गट-ब पदावर पदोन्नतीमध्ये अपंगांना आरक्षण लागू नसले तरी अपंग व्यक्ती, पदोन्नतीकरीता लावलेले निकष पूर्ण करत असल्यास त्यांचा गट-अ व गट-ब पदावर पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०१८१०५४०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के.पी.बक्षी
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

# लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांवर पदोन्नतीने नेमणूका करण्यासंबंधीचे प्रस्ताव आयोगाकडे पाठविणेबाबत

भाग

२६

पदोन्नती

लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे पदोन्नतीने नेमणुका करण्यासंबंधीचे प्रस्ताव आयोगाकडे संदर्भित करण्या-संबंधीचे प्रपत्र.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक, क्रमांक-एसआरव्ही-१०८४/३२१७/प्र.क्र.५४/८४/१२,

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १५ एप्रिल, १९८६.

**शासन परिपत्रक**

लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करण्याचे अथवा पदोन्नतीसाठी निवडसूची तयार करण्याचे प्रस्ताव मंत्रालयीन विभागाकडून आयोगाकडे सहमतीसाठी पाठविले जातात. आयोगाने शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अशा प्रस्तावांची छाननी करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी माहिती प्रस्तावामध्ये नमूद केली जात नाही. सदर माहिती संबंधीत विभागांकडून उपलब्ध करण्यामध्ये कालापव्यय होतो. परिणामी पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदांवर नेमणुका करण्यास विलंब होतो. सदर विलंब कमी करण्यासाठी, आयोगाच्या कक्षेतील पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करण्याचे अथवा निवडसूची बनविण्याचे प्रस्ताव आयोगाकडे विहित प्रपत्रांमध्ये संदर्भित करण्यात यावेत असे आयोगाच्या विचारविनिमयाने शासनाने आदेश दिले आहेत.

सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, पदोन्नतीने नियुक्ती करण्याचे अथवा निवडसूची बनविण्याचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात दिलेल्या रकान्यातील माहितीसह आयोगाकडे संदर्भित करण्याचे दक्षता कृपया घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

म. ज. देशमाने

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८४/ ३२९७/प्र.क्र.५४/८४/१२, दिनांक १५ एप्रिल, १९८६ सोबतचे जोडपत्र.

--------------

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे संदर्भित करावयाच्या पदोन्नती किंवा निवडसूची प्रस्तावासंबंधीच्या प्रपत्राचा मसुदा".

१) विभागाचे नांव :

२) ज्या पदावर पदोन्नती करावयाची त्याचा तपशील :

३) (अ) पदनाम :

(ब) कोठल्या सेवेत व वर्गात अंतर्भूत :

(क) वेतनश्रेणी :

(ड) भरावयाच्या पदांची संख्या :

(इ) मागासवर्गीयांसाठी आरक्षण असल्यास त्याबाबत तपशील :

(ई) सेवाप्रवेश नियम विहीत केले असल्यास त्यांची प्रत सोबत पाठविली आहे काय, :

३) ज्यांना पदोन्नती द्यावयाची प्रस्तावित आहे ते अधिकारी सेवाप्रवेश नियमातील पदोन्नतीच्या अटी पूर्ण करतात काय ? :

४) विचाराधीन अधिकाऱ्यांचे मूळ गोपनीय अभिलेख सोबत पाठविले आहेत काय? व ते अद्ययावत आहेत काय, :

५) विचाराधीन अधिकाऱ्यांची ज्येष्ठतासूची सोबत पाठविली आहे काय, अधिक्रमण प्रस्तावित असल्यास त्याचे समर्थन सोबत पाठविले आहे काय, :

६) निम्न पद (म्हणजे ज्या पदावर पदोन्नती देण्यात आली किंवा द्यावयाची आहे, त्याच्या खालचे पद) आयोगाच्या कक्षेत असल्यास त्या पदावरील नेमणूकीस आयोगाने मान्यता दिली होती काय व केव्हा ?
(आयोगाच्या संबंधित पत्राचा क्रमांक व दिनांक शक्य तो नमूद करावा) :

७) प्रस्तावित निवडसूचीची प्रत सोबत पाठविली आहे काय,

**पदोन्नती**

**लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांवर पदोन्नतीने नेमणुका करण्यासंबंधीचे प्रस्ताव आयोगाकडे संदर्भित करण्यासंबंधीचा प्रश्न.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
**शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२००३/मुसं.३१/प्र.क्र.१७/०३/१२,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ६ ऑक्टोबर, २००३.**

वाचा :- १) शासन परिपत्रक,क्रमांक : पीएससी-१०७०-ड, दिनांक २५ सप्टेंबर,१९७०.
२) शासन परिपत्रक ,क्रमांक:पीएससी-१२८३९/४४८०/ड, दि.१० सप्टेंबर, १९७०.
३) शासन परिपत्रक, क्रमांक: एसआरव्ही-१०८४/३२९७/प्र.क्र.५४०/८४/१२, दि.१५ एप्रिल, १९८६.
४) शासन परिपत्रक, क्रमांक: मलोआ-मुस-४८/प्र.क्र.६५/९३/८, दि.३० डिसेंबर, १९९३.

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करण्याचे अथवा पदोन्नतीसाठी निवडसूची तयार करण्याचे प्रस्ताव मंत्रालयीन विभागाकडून आयोगाकडे सहमतीसाठी कसे पाठवावयाचे याबाबतच्या सूचना वरील परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. तरीही, लोकसेवा आयोगाने शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, प्रस्ताव विहित प्रपत्रात न पाठविणे,प्रस्तावात समावेश असलेल्या अधिका-यांपैकी काही अधिका-यांचे गोपनीय अभिलेख उपलब्ध करुन न देणे, निम्न पदाची ज्येष्ठता यादी व सेवा प्रवेश नियमाची प्रत न पुरविणे इत्यादी तसेच प्रस्तावासंदर्भात शासनाकडून मागविलेली माहिती/संबंधित कागदपत्रे या ना त्या कारणासाठी आयोगास पुरविण्यास टाळाटाळ करणे इत्यादी स्वरुपाच्या अनियमतता शासनाच्या संबंधित विभागाकडून घडत आहेत. तसेच न्यायालयीन प्रकरणात, संबंधित विभाग ते प्रकरण आयोगाकडेच प्रलंबित असल्याचे सांगून नामानिराळे होतात. परिणामी न्यायालयाच्या टिकाटिप्पणीला नाहकपणे आयोगाला सामोरे जावे लागते. परिणामी यापुढे असे परिपूर्ण नसलेले प्रस्ताव प्राथमिक छाननी अंती शासनास परत करण्यात येतील असा आयोगाने निर्णय घेतला आहे.

सदर आयोगाचा निर्णय सर्व मंत्रालयीन विभागांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. तसेच सर्व मंत्रालयीन विभागांना पुन्हा सुचित करण्यात येते की, यापुढे आयोगाला निवडसूच्यांना मान्यता देण्याचे प्रस्ताव पाठविताना सोबतच्या तपासणीसूचीनुसार सर्व माहिती दिली जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच असे प्रस्ताव आयोगाला पाठविताना वर नमूद केलेल्या दिनांक १०.९.१९७० च्या परिपत्रकातील सूचनांनुसार सर्व संबंधित अधिका-यांचे संबंधित वर्षाचे गोपनीय अहवाल आयोगास प्रस्तावासोबत पाठविले जातील याचीही दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. कृ. [illegible]
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२००३/मुस-१७/०३/बारा,
दिनांक ६ ऑक्टोंबर, २००३ चे सहपत्र.

## निवडसूचीच्या प्रस्तावाबाबत आवश्यक असणारी तपासणी सूची

(१) शासन परिपत्रक क्र. -पीएससी-१०७०-ड, दिनांक १५ एप्रिल, १९८६ सोबतच्या प्रपत्रातील माहिती.

१. विभागाचे नाव --

२. ज्या पदावर पदोन्नती करावयाची त्याचा तपशील --

(अ) पदनाम --

(ब) कोठल्या सेवेत व वर्गात अंतर्भूत --

(क) वेतनश्रेणी --

(ड) भरावयाच्या पदांची संख्या --

(इ) मागासवर्गीयांसाठी आरक्षण असल्यास त्याबाबत तपशील ---

(ई) सेवा प्रवेश नियम विहित केले असल्यास त्यांची प्रत सोबत पाठविली आहे काय ?

३. ज्यांना पदोन्नती द्यावयाची प्रस्तावित आहे ते अधिकारी सेवा प्रवेश नियमातील पदोन्नतीच्या अटी पूर्ण करतात काय?

४. विचाराधीन अधिका-यांचे मूळ गोपनीय अभिलेख सोबत पाठविले आहेत काय? व ते अद्ययावत आहेत काय?

५. विचाराधीन अधिका-यांची ज्येष्ठतासूची सोबत पाठविली आहे काय ? अधिक्रमण प्रस्तावित असल्यास त्याचे समर्थन सोबत पाठविले आहे काय ?

६. निम्न पद (म्हणजे ज्या पदावर पदोन्नती देण्यात आली किंवा द्यावयाची आहे, त्याच्या खालचे पद) आयोगाच्या कक्षेत असल्यास त्या पदावरील नेमणूकीस आयोगाने मान्यता दिली होती काय व केव्हा ? (आयोगाच्या संबंधित पत्राचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.)

७. प्रस्तावित निवडसूचीची प्रत सोबत पाठविली आहे काय ?

(२) प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाची सहमती.

(३) विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

(४) मागासवर्गीयांचे प्रवर्गनिहाय आरक्षण, मागील अनुशेष, वापरलेली बिंदूनामावली.

(५) मागील निवडसूची करिता वापरलेली बिंदू नामावली.

(६) विचारक्षेत्रात येणा-या अधिका-यांची यादी.

(७) ज्या अधिका-यांना त्वरित बढतीस्थान देण्याचे प्रस्तावित असेल त्यांची नावे.

***_______***

# आस्थापना मंडळे, त्यांची कार्यकक्षा व सुधारित कार्यपध्दती

भाग २७

**आस्थापना मंडळ**

पदोन्नतीसाठी निवडसूची तयार करतांना पुरेशा व्यक्तींचा विचार करण्याच्या संदर्भात विचारक्षेत्रातील ( zone of consideration ) अधिकाऱ्यांची संख्या ठरविणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : इएसबी-१०८९/२५-८९/१३,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : २३ फेब्रुवारी, १९८९

पहा : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : इएसबी-१०८४-३७३/प्र.क्र.३८-८५/१३, दि.१९ मे, १९८७.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : इएसबी-१०८९/प्र.क्र. ६-८९/१३, दि. ३ फेब्रुवारी, १९८९.

निर्णय :-

उपरोक्त दिनांक १९ मे,१९८७ च्या परिपत्रकाच्या जोडपत्र "अ" येथील बाब क्र.८ अन्वये असे आदेश देण्यात आलेले आहेत की, आस्थापना मंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव पाठवितांना पदोन्नतीच्या विचारार्थ ज्येष्ठता सूचीप्रमाणे क्रमाने येणाऱ्या सर्व पात्र व अपात्र अधिकाऱ्यांची नावे (पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येच्या दुप्पट परंतु कमीत कमी सहा अधिकाऱ्यांची नावे) प्रस्तावात नमूद करावीत व सदर सहा अधिकारी अपात्र अधिकाऱ्यांना जमेस न धरता असावेत.

२. शासनाने याबाबत पुनर्विचार करुन आस्थापना मंडळाच्या कार्यकक्षेतील पदांवरील पदोन्नत्यांसाठी करावयाच्या निवडसूचीच्या संदर्भातील प्रस्तावात नावे नमूद करावयाच्या अधिकाऱ्यांच्या संख्येबाबत पुढीलप्रमाणे सुधारीत निर्णय घेतलेले आहेत. :-

अ. एक ते तीन पदांवरील पदोन्नत्यांसाठी निवडसूची करावयाची असल्यास कमीतकमी सहा अधिकाऱ्यांची नावे ज्येष्ठताक्रमाने नमूद करण्यात यावीत.

ब. चार ते दहा पदांवरील पदोन्नत्यांसाठी निवडसूची करावयाची असल्यास पदोन्नतीने भरावयाच्या पदांच्या दुप्पट संख्येइतक्या अधिकाऱ्यांची नावे ज्येष्ठताक्रमाने नमूद करण्यात यावीत.

क. दहा पेक्षा जास्त पदांवरील पदोन्नत्यांसाठी निवडसूची करावयाची असल्यास पदोन्नतीने भरावयाच्या पदांच्या दीडपट संख्ये इतक्या तथापि, कमीतकमी वीस संख्ये इतक्या अधिकाऱ्यांची नावे ज्येष्ठताक्रमाने नमूद करण्यात यावीत.

३. वरीलप्रमाणे अधिकाऱ्यांची संख्या मोजताना पदोन्नतीच्या विचारार्थ अपात्र असलेल्या (सेवाप्रवेश नियमातील तरतुदींनुसार किंवा अन्य काही कारणांमुळे) अधिकाऱ्यांची नावे जमेस न धरता त्यांची नावे त्यांच्या ज्येष्ठतानुसार प्रस्तावात नमूद करण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-
(भा.म.भणगे)
शासनाचे उप सचिव.

सुधारित वेतनश्रेणीस अनुसरुन आस्थापना
मंडळाच्या कार्यकक्षेतील पदे ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक: ईएसबी-११०९/प्र.क्र.४०/०९/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ डिसेंबर,२००९.

वाचा : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : ईएसबी-१०८४/प्र.क्र.३८/१३. दि.१९.५.१९८७.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : ईएसबी-१०८९/प्र.क्र.६/१३, दि.३.२.१९८९.
३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : ईएसबी-१०८९/प्र.क्र.३७/१३. दि.२५.४.१९८९.
४) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: ईएसबी-१०८९/प्र.क्र.३७/१३. दि.११.१२.१९८९.
५) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: ईएसबी-१०९९/प्र.क्र.२९/१३, दि.२०.४.१९९९.

शासन निर्णय :

उपरोक्त दि.२०.४.१९९९ च्या शासन निर्णयान्वये, शासन सेवेतील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१२,००० ते १५,०००/- या वेतनश्रेणीतील आहे. अशा सर्व पदांवरील पदोन्नत्यांसाठी अधिकाऱ्यांची निवड करण्याची बाब आस्थापना मंडळ क्र.२ च्या कार्यकक्षेत येईल व ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१६४०० वा त्यापेक्षा जास्त आहे अशा राज्य शासन सेवेतील सर्व पदांवरील पदोन्नतीसाठी अधिकाऱ्यांची निवड करण्याची बाब आस्थापना मंडळ क्र.१ च्या कार्यकक्षेत राहील असे आदेशित करण्यात आले होते.

शासन अधिसुचना वित्त विभाग क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि.२२/०४/२००९ अन्वये शासकीय कर्मचारी/ अधिकारी यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक पदासाठी पे-बँड (+) ग्रेड पे देण्यात आले आहे. सदर सुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन आस्थापना मंडळाच्या कार्यकक्षेतील पदे ठरविण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने याबाबत असा निर्णय घेतला आहे की, ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान सुधारित टप्पा पे-बँड रु.१५,६००-३९,१०० अधिक ग्रेड पे रु.७,६००/- व त्यावरील श्रेणीत आहे अशा सर्व पदांवरील पदोन्नतीसाठी अधिकाऱ्यांची निवड करण्याची कार्यवाही आस्थापना मंडळ क्र.२ च्या कार्यकक्षेत येईल.

तसेच ज्या पदांच्या सुधारित वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.३७,४००-६७,००० अधिक ग्रेड पे रु.८,९००/- व त्यापेक्षा अधिक या वेतनश्रेणीत आहे अशा सर्व पदांवरील पदोन्नतीसाठी अधिकाऱ्यांची निवड करण्याची कार्यवाही आस्थापना मंडळ क्र.१ च्या कार्यकक्षेत येईल.

तरी मंत्रालयाच्या सर्व प्रशासकीय विभागांनी आस्थापना मंडळाच्या विचारार्थ पाठवावयाचे प्रस्ताव, पदोन्नतीने भरावयाचे पद रिक्त होण्याच्या किमान तीन महिने अगोदर विहित नमुन्यात सामान्य प्रशासन विभागाकडे स्वतंत्र गोपनीय पत्राद्वारे पाठवावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९१२३०१२१९२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( मं.चिं.पाटील )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

<u>आस्थापना मंडळ क्रमांक २ ची पुनर्रचना.</u>

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : ईएसबी १११३/प्र.क्र.२७८/१३,**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ७ मे,२०१४.

<u>वाचा :</u>

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : ईएसबी १०८९/प्र.क्र.३७-८९/१३, दिनांक २० डिसेंबर, १९९०.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : ईएसबी १११०/प्र.क्र.१/२०१०/१३, दिनांक १५ जानेवारी, २०१०.

<u>शासन निर्णय :-</u>

आस्थापना मंडळ क्र.२ ची शासन मान्यतेने खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | .. अध्यक्ष |
| २. | श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग | .. सदस्य |
| ३. | श्री.राजगोपाल देवरा, सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | .. सदस्य |
| ४. | श्रीमती राधिका रस्तोगी, सचिव (ले.व को.), वित्त विभाग | .. सदस्य |
| ५. | प्रधान सचिव/सचिव (साविस) (का.१६ब), सामान्य प्रशासन विभाग | .. सदस्य |
| ६. | उप सचिव (का.१३), सामान्य प्रशासन विभाग | .. सदस्य-सचिव |

२. आस्थापना मंडळाच्या सदस्यांची संख्या ६ इतकी असल्यामुळे मंडळाच्या बैठकीसाठी अध्यक्ष व सदस्य-सचिव यांच्या व्यतिरिक्त इतर सदस्यांपैकी किमान २ सदस्य उपस्थित राहणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०५०७१११०८०७८५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2014.05.07 13:36:16 +05'30'

**( पां.जो.जाधव )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

आस्थापना मंडळाच्या विचारार्थ सादर
<u>करण्यात येणारे पदोन्नतीचे प्रस्ताव</u>
सुधारित कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : ईएसबी-१११४/प्र.क्र.२४६/१३.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २०१४.

**संदर्भ :-** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक.इएसबी-११०४/प्र.क्र.८/०४/१३, दिनांक १५ मे, २००४.

**<u>शासन परिपत्रक :</u>**

राज्य शासनाच्या सेवेतील गट-अ संवर्गातील रु.७६००/- व त्यापेक्षा जास्त ग्रेड पे असलेल्या पदांवरील पदोन्नतीचे प्रस्ताव आस्थापना मंडळाच्या शिफारशीसाठी सादर केले जातात. त्यापैकी रु.८९००/- व त्यापेक्षा जास्त ग्रेड पे असलेल्या राज्य शासनाच्या सेवेतील पदांवरील पदोन्नतीचे प्रस्ताव आस्थापना मंडळ क्र.१ च्या शिफारशीसाठी ठेवले जातात. रु.७६००/- व त्यापेक्षा जास्त परंतु रु.८९००/- पेक्षा कमी ग्रेड पे असलेल्या पदांवरील पदोन्नतीचे प्रस्ताव हे आस्थापना मंडळ क्र.२ च्या शिफारशीसाठी सादर केले जातात. आस्थापना मंडळापुढे विविध प्रशासकीय विभागांकडून राज्य शासनाच्या सेवेत वेगवेगळया पदांवरील पदोन्नतीचे सादर होणारे प्रस्ताव हे आवश्यक असलेल्या सुसंगत माहितीसह प्राप्त होत नसल्यामुळे आस्थापना मंडळाच्या सदस्यांना हे प्रस्ताव अभ्यासण्यासाठी अडचणीचे ठरते. हे विचारात घेऊन तसेच पदोन्नत्या, ज्येष्ठता सूची व मागासवर्गाचे आरक्षण, पदे मंजुरी, सेवाविषयक विहीत केलेली विवरणपत्रे इत्यादीबाबत सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित केलेले सुधारित आदेश विचारात घेऊन आस्थापना मंडळाच्या विचारार्थ सादर करायच्या प्रस्तावासाठी सोबत जोडलेली <u>सुधारीत विवरणपत्रे विहीत करण्यात येत आहेत.</u>

२. आस्थापना मंडळापुढे सादर करण्यात येणारे प्रस्ताव अधिक सुटसुटीत व क्रमवार माहिती देणारे असावेत या दृष्टीने यापुढे सोबत जोडलेल्या विवरणपत्रात सर्व कागदपत्रांचे संच क्रमवार लावून प्रत्येक पृष्ठाला क्रमांक देण्यात यावा. अशाप्रकारे आस्थापना मंडळापुढे सादर करावयाच्या संचामधून सुरुवातीला प्रस्तावासोबत जोडलेल्या <u>कागदपत्रांची अनुक्रमणिका व त्यावर पृष्ठ क्रमांक</u> देऊन प्रत्येक संच तयार करण्यात यावा, प्रत्येक पदावरील पदोन्नतीसाठी अशाप्रकारे १० संच, पत्रासह आस्थापना मंडळाच्या विचारार्थ सामान्य प्रशासन विभागाकडे यापुढे विभागाने सादर करणे

आवश्यक आहे. प्रस्ताव परिपुर्ण कागदपत्रासह सादर करण्यात आले किंवा कसे यासाठी प्रस्तावाची तपासणी सूची प्रमाणित करुन विभागाने सादर करणे अनिवार्य आहे.

३. तपासणी सूचीनुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन सादर न करण्यात येणारे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागात यापुढे स्वीकारले जाणार नाही व ते त्या टप्प्यावरच परत करण्यात येतील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०५१६१४२६४१२९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2014.05.17 10:31:26 +05'30'

(डॉ.भगवान सहाय)

प्रधान सचिव(सेवा), महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांकः ईएसबी-१११४/प्र.क्र.२४६ /१३.

## आस्थापना मंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव

विभागाचे नाव- ---------------------------------------------------------------

विषय:- ---------------------------------------------------------------

सेवेतील

---------------------------------------- या पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्ताव.

## अनुक्रमणिका

| क्र. | जोडलेल्या कागदपत्राचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावाच्या छाननीचे मुद्दे | |
| २. | जोडपत्र-अ | |
| ३. | जोडपत्र-ब | |
| ४. | जोडपत्र-क | |
| ५. | जोडपत्र-ड | |
| ६. | | |
| ७. | | |
| ८. | | |
| ९. | | |
| १०. | | |
| ११. | | |
| १२. | | |
| १३. | | |
| १४. | | |
| १५. | | |
| १६. | | |
| १७. | | |
| १८. | | |
| १९. | | |
| २०. | | |

## आस्थापना मंडळासमोर सादर करावयाच्या प्रस्तावाच्या छाननीचे मुद्दे

| आस्थापना मंडळ क्रमांक १/ २ | |
|---|---|
| प्रस्तावाचा विषय - | |
| विभागाचे नाव - | |
| पदोन्नतीच्या पदाचे नाव- | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी - |
| निम्न संवर्गातील पदाचे नाव- | निम्न संवर्गातील पदाची वेतनश्रेणी - |

| क्र. | छाननीचे मुद्दे | |
|---|---|---|
| १. | वित्त विभागाच्या सहमतीने पदांचा आढावा (सुधारीत आकृती बंध) मंजूर झाला आहे काय? असल्यास शेवटच्या मंजूरीचा दिनांक | होय / नाही<br>तारीख |
| २. | पदोन्नतीने भरावयाची पदे दिर्घकाळ रिक्त असल्यास वित्त विभागाच्या आदेशानुसार ही पदे पुनर्जिवीत करण्यात आली आहेत काय ? | होय / नाही |
| ३. | प्रस्तावासोबत उपलब्ध रिक्त पदांवरील आरक्षणाला सा.प्र.वि./मागास वर्ग कक्षाच्या मान्यतेची टिप्पणी सादर केली आहे काय? | होय / नाही |
| ४. | प्रस्तावित पदोन्नतीच्या पदाकरीता सेवा प्रवेश नियम / सुधारित सेवा प्रवेश नियम अधिसूचित केले आहेत काय? असल्यास केव्हा? सेवा प्रवेश नियमाची प्रत सोबत जोडली आहे काय? | होय / नाही<br>तारीख |
| ५. | विचारक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांचा समावेश असलेली निम्न संवर्गाची चालू वर्षी १ जानेवारीची अद्यावत अंतिम ज्येष्ठतासूची सादर केली आहे काय ? | होय / नाही |
| ६. | ज्येष्ठतासूचीच्या प्रतीमध्ये प्रस्तावित विचारक्षेत्रात समाविष्ट अधिकाऱ्यांपेक्षा ज्येष्ठ अधिकाऱ्यांबाबतची स्थिती (जसे यापुर्वी पदोन्नत/सेवानिवृत्त /निधन/पदोन्नती नाकारली इत्यादी) याबाबत नमुद करून प्रमाणित प्रत सादर केली आहे काय? | होय / नाही |
| ७. | वरील ज्येष्ठतासूचीबाबत प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत काय? असल्यास न्यायालयाचा स्थगिती वा अन्य आदेश आहेत काय? | होय / नाही |
| ८. | विचार क्षेत्रातील सर्व अधिकाऱ्याचे पदोन्नतीसाठी विचारात घ्यावयाचे सलग ५ वर्षाचे गोपनीय अहवाल शासन निर्णय, सा.प्र.वि. दिनांक १/२/१९९६ मधील सूचना क्र. ६१ व शासन निर्णय, सा.प्र.वि. दि. १/१/२०११ मधील सुचना क्र. ५१ नुसार परीपूर्ण आहेत काय ? | होय / नाही |
| ९. | सन २०१०-११ व तत्पुर्वीच्या गोपनीय अहवालातील पदोन्नतीच्या आड येणाऱ्या शेऱ्यांबाबत शासन निर्णय, सा.प्र.वि. दि. १३/२/२०१४ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय? | होय / नाही |

| | | |
|---|---|---|
| ". | विचारक्षेत्रातील मागासवर्गीय सर्व अधिकाऱ्यांची जात प्रमाणपत्र पडताळणी झाली आहे काय? मागासवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या जाती वैधता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती सोबत जोडल्या आहेत काय ? | होय / नाही |
| ११. | विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी शा.नि.,सा.प्र.वि., दि.१५.०७.१९८६ व अलीकडील शासन निर्णयानुसार चालू वर्षापर्यंतचे मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केली आहेत काय ? | होय / नाही |
| १२. | विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे वयाच्या ५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन झाले आहे काय? | होय / नाही |
| १३. | विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असलेल्या विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांची त्याबाबतची सद्य:स्थितीची थोडक्यात माहिती सादर केली आहे काय? | होय / नाही |
| १४. | विचारक्षेत्रात असलेल्या अधिकाऱ्यांपैकी कोणाविरूध्द शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे काय? | होय / नाही |
| १५. | अनुभवाची अट शिथिल करून पदोन्नती देण्याचा प्रस्ताव असल्यास शिथिलीकरणास अ.मु.स.(गृह) यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता आहे काय? मान्यतेची प्रत सोबत जोडली आहे काय? | होय / नाही |

सह / उप सचिव (आस्थापना) यांचे नाव, पदनाम व सही

फोन कार्यालय- मोबाईल -

# जोडपत्र-अ

*** आस्थापना मंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव***

**विषय:- ------------------------------------------------------------------------------------------------- या सेवेतील**

**------------------------------------------------------------------------ या पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्ताव.**

**१. विभागाचा तपशील :-**

| | | नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रस्ताव पाठविणारा मंत्रालयीन विभाग | | --- |
| २ | विभागाचे सचिव /प्रधान सचिव/ अ.मु.स | | |
| ३ | सह सचिव/उप सचिव (आस्थापना) | | |
| ४ | कार्यासन अधिकारी व कार्यासन क्र. | | |

**२. पदोन्नतीच्या पदाचा तपशील:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी :- | पे बॅन्ड<br>ग्रेड पे | |
| २. | पदोन्नतीच्या पदाच्या निम्न संवर्गाचे (Feeder Cadre) नाव व वेतनश्रेणी :- | ----------------------------------<br>--------<br>पे बॅन्ड<br>ग्रेड पे | |
| ३. | पदोन्नतीच्या संवर्गाच्या पदांचा आढावा मंजुरी आदेश. | दिनांक<br>(प्रत जोडली आहे.) | पृ. क्र. |
| ४. | सेवा प्रवेश नियम / सुधारित सेवा प्रवेश नियम | दिनांक<br>(प्रत जोडली आहे.) | पृ. क्र. |
| ५. | सेवा प्रवेश नियमातील पदे भरण्याचे गुणोत्तर प्रमाण:- | | |
| ६. | पदोन्नतीसाठी सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक अर्हता व अनुभव कालावधी:- | | |
| ७. | पदोन्नतीच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याचे थोडक्यात विवरण:- | प्रत जोडली आहे. | पृ. क्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | नामनिर्देशनाच्या कोटयातील पदे रिक्त असल्यास सदर पदे भरण्याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा तपशील. | | |

३. रिक्त पदांचा तपशील :-

| मंजूर पदे | संवर्गातील पदे - (+) प्रतिनियुक्तीची पदे- (—) एकूण पदे- | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नियुक्तीचा मार्ग | नियुक्तीचे प्रमाण % | कोटयातील पदे | भरलेली पदे | सध्या रिक्त पदे | संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे |
| सरळ सेवा | | | | | | |
| पदोन्नती | | | | | | |
| अन्य मार्ग | | | | | | |
| एकूण | १००% | | | | | |

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१ व शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:असंक १००१/ प्र.क्र.२९/ २००१/ वित्तीय सुधारणा, दिनांक १ सप्टेंबर, २००४ मधील सूचना विचारात घेता, या प्रस्तावात पदोन्नतीने भरण्यासाठी अंतर्भूत असलेली पदे व्यपगत झालेली आहेत काय? पदे व्यपगत झाली असल्यास, ती वित्त विभाग/ उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने पुनरूज्जीवित करून घेण्यात आली असल्यास आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. (पृ......./ प. वि.)

५. निम्न संवर्गाची चालू वर्षी प्रसिध्द केलेली अंतिम ज्येष्ठतासूची (पृ......../ प. वि.)

| ज्येष्ठता सूची प्रसिध्द दिनांक | ज्येष्ठता सूची कोणत्या दिनांकाच्या स्थितीस अनुसरून प्रसिध्द केली आहे तो दिनांक |
|---|---|
| | |

६. प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता सूच्यांबाबत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तपशील :-

| याचिका क्रमांक | याचिकाकर्त्याचे नाव | याचिकेतील मागणीचे थोडक्यात स्वरूप | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

७. ज्येष्ठता सूचीवरील यापूर्वी पदोन्नतीसाठी पात्र/सेवानिवृत्त/राजीनामा इत्यादी कारणास्तव विचारक्षेत्रात समावेश न केलेल्या अधिकाऱ्यांच्या नावासमोर नोंदी घेऊन प्रमाणित केलेली ज्येष्ठतासूचीची प्रत सादर केली आहे. (पृ...../ प. वि.)

८. आस्थापना मंडळाने पदोन्नतीसाठी यापुर्वी शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली नाही किंवा ज्यानी पदोन्नती नाकारली आहे त्यांचा तपशील:-

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | आस्थापना मंडळाच्या शिफारसीबाबतचे पत्र क्रमांक व दिनांक | पदोन्नती न देण्यात आल्याचे/स्वत: नाकारण्याचे कारण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

९. पदोन्नतीचे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येत असल्यास यापुर्वीच्या निवडसुच्यांना आयोगाची मान्यता प्राप्त करण्याबाबतची सदय:स्थिती काय आहे? पद आयोगाच्या कक्षेत येत नसल्यास त्याबाबतच्या आदेशाची प्रत जोडावी (पृ………/ प. वि.)

१०.रिक्त पदांसाठी निश्चित केलेल्या आरक्षणाचा तपशील :- सा.प्र.वि.मा.व.क. च्या मान्यतेची टिप्पणीची प्रत (पृ……../ प. वि.)

११.पदोन्नतीसाठी जाती प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची ज्येष्ठतानुक्रमे वैयक्तिक माहिती जोडपत्र-ब (पृ…../ प. वि.)

| निवडसूचीवर पदोन्नतीची रिक्त पदे | सा.प्र.वि.मागास वर्ग कक्षाने निश्चित केलेले आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | खुला |
| | | | | | | | | |

१२.विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचा सेवाविषयक वैयक्तिक(Profiles)माहितीबाबत जोडपत्र-क (पृ……/प)

१३.विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालाबाबतची माहिती जोडपत्र-ड (पृ………/प)

१४.विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या अलिकडच्या ५ वर्षाचे गोपनीय अहवालातील प्रतिकुल/पदोन्नतीच्या आड येणारे शेरे संबंधितांना कळविल्याच्या प्रती तसेच, त्यावर त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अभिवेदनावर घेतलेल्या निर्णयाच्या प्रती गोपनीय अहवाल धारिकेत समाविष्ट करुन शा.नि.,सा.प्र.वि.,दि.१.११.२०११ च्या परिशिष्ट-अ मधील सूचना क्रमांक ५१ नुसार व शा.नि.,सा.प्र.वि.,दि.१३.२.२०१४ नुसार परिपूर्ण गोपनीय अहवाल धारिका सादर केल्या आहेत काय? (अलिकडच्या ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांना वर्षवार पताका लावण्यात याव्यात.)

१५.सदर पदावर पदोन्नतीसाठी या पूर्वीच्या निवडसूचीबाबत आस्थापना मंडळाच्या शिफारशीसंबंधीच्या पत्राची प्रत (पृ…../ प. वि.)

१६.पदोन्नतीच्या प्रस्तावात विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर १०८५/२५७९/४६/अकरा, दिनांक १५.०७.१९८६ नुसार चालू वर्षी १ जानेवारीचे मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केली आहेत त्याचा तपशील.

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | मत्ता व दायित्वे दिनांक ---- ची स्थिती | विवरणपत्र सादर केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

१७.वरील व्यतिरिक्त आस्थापना मंडळापुढे सादर करण्यायोग्य असलेली माहिती.

(१) ............................................................................(पृ........../प)

(२) ............................................................................(पृ........../प)

(३) ............................................................................(पृ........../प)

दिनांक:- प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह / उप सचिव (आस्थापना) यांची सही

## जोडपत्र "ब"

**प्रस्तावित निवडसूचीत समाविष्ट करण्यासाठी खुल्या तसेच मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गातील अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी प्रवर्गनिहाय विचारक्षेत्रात येणारे अधिकारी व त्यांचा तपशील (खुला प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) विशेष मागास प्रवर्ग या प्रमाणे**

| अ. क्र. | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांचा जातीप्रवर्ग | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | त्यांचा सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | जन्मदिनांक व सध्याचे पद | शैक्षणिक अर्हता | सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त आहे /नाही | ज्या पदावरून पुढील पदावर पदोन्नती देय आहे त्या पदावर रुजू होऊन सेवा किती व केव्हापासून | [illegible] | वयाच्या ५०/५५ व्या वर्षी झालेल्या पुनर्विलोकनाचा निर्णय | जातीचे प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली आहे किंवा कसे? | विभागीय चौकशी/ प्रशासकीय चौकशी चालू आहे/नाही (असल्यास [illegible] नमूद करावी.) | पूर्वी पदोन्नती [illegible] असल्यास [illegible] दिनांक व सा.प्र.वि. च्या संबंधित [illegible] नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | खुलाप्रवर्ग | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | अनुसूचित जाती | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | अनुसूचित जमाती | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | विमुक्त जाती (अ) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

शासन परिपत्रक क्रमांक ईएसबी-१११४/प्र.क्र.२४६ /१३.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भटक्या जमाती (ब) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | भटक्या जमाती (क) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | भटक्या जमाती (ड) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | विशेष मागास प्रवर्ग | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

दिनांक:- प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह / उप सचिव (आस्थापना) यांची सही

## जोडपत्र — क

### विचारक्षेत्रातील अधिकाऱ्याची वैयक्तिक सेवाविषयक माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकाऱ्याचे नाव | |
| २. | शासनाच्या सेवेतील प्रथम नेमणुकीचा दिनांक | |
| ३. | गट अ चे पद जेव्हापासून सलग धारण करीत आहे तो दिनांक व त्या पदाचे नाव | |
| ४. | गेल्या दहा वर्षाच्या कालावधीपासून आतापर्यंत ते धारण करीत असलेल्या सर्व पदांचा तपशील | |
| ५. | घेतलेल्या प्रशिक्षणाचा तपशिल | |
| ६. | सेवेमध्ये असताना केलेली उल्लेखनीय कामगिरी | |
| ७. | विभागीय व शिस्तभंगविषयक कार्यवाहीसुरु आहे का? असल्यास दोषारोपांची थोडक्यात माहीती व चौकशीची सद्य:स्थिती | |
| ८. | पुर्वी झालेल्या चौकशीअंती शिक्षा दिली असल्यास शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे का? | |
| | शिक्षेची स्वरुप काय? शिक्षेचा अंमल कधीपर्यंत आहे? | |
| ९. | अधिकाऱ्याची सचोटी संशयास्पद आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा व संबंधित चौकशीच्या अहवालाची प्रत सोबत जोडावी. | |
| १०. | सदर अधिकाऱ्याबाबत काही अतिरिक्त गोपनीय किंवा विशेष माहिती (गुणदोषांसह) आस्थापना मंडळाच्या निदर्शनास आणावयाची असल्यास तशी माहिती | |
| ११. | काही न्यायालयीन प्रकरणे असल्यास त्याबाबतची सद्य:स्थिती. | |

दिनांक:- प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह / उप सचिव (आस्थापना) यांची सही

# जोडपत्र ड

## विचारक्षेत्रातील अधिकाऱ्याच्या गोपनीय अहवालांबाबतची माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकाऱ्याचे नाव | |
| २. | अधिकाऱ्याची गोपनीय अहवाल नस्ती अद्यावत आहे का? | |
| ३. | नसल्यास गोपनीय अहवाल कोणत्या कालावधीसाठी उपलब्ध नाहीत? | |
| ४. | उपलब्ध नसलेले गोपनीय अहवाल किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येतील? | |
| ५. | गोपनीय अहवाल उपलब्ध होऊ शकत नाहीत त्याबद्दलची विहित नमुन्यातील सकारण प्रमाणपत्रे नस्तीत योग्य ठिकाणी ठेवलेली आहेत काय? | |
| ६. | गोपनीय अहवालाच्या प्रती संबंधित अधिकाऱ्यांना देऊन त्याची पोच मुळ गोपनीय अहवालावर घेण्यात आली आहे काय? (सन २०११-१२ पूर्वीच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल/टिकात्मक/सूचनात्मक तसेच पदोन्नतीला बाधा येणारे शेरे असल्यास ते संबंधित अधिकाऱ्यास कळविण्यात आले आहेत काय?) | |
| ७. | गोपनीय अहवालातील शेऱ्यांविरूध्द संबंधित अधिकाऱ्याने अभिवेदन सादर केले आहे का? | |
| ८. | प्रतिकूल/सूचनात्मक/पदोन्नतीच्या आड येणाऱ्या शेऱ्यांविरूध्दचे अभिवेदनावर घेतलेल्या निर्णयाची प्रत गोपनीय अहवाल धारिकेत योग्य ठिकाणी समाविष्ट केली आहे काय? | |
| ९. | असे अभिवेदन विचाराधीन असेल तर त्याबाबतची सद्यस्थिती व त्यावर अंतिम निर्णय घेण्यासाठी अपेक्षित कालावधी | |

------------

दिनांकः- प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह / उप सचिव (आस्थापना) यांची सही

# चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत

भाग

२८

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२-८५/तेरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १५ एप्रिल, १९९१

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-११७४/२०३२/बारा, दिनांक २३ सप्टेंबर, १९७५
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-११७४/२०३२/ १३९०/ बारा, दिनांक ७ जुलै, १९७६
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८९/ प्र.क्र.२४/८९/१२, दिनांक २६ नोव्हेंबर, १९९०
(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८९/ प्र.क्र.२४-अ/ ८९/१२, दिनांक २६ नोव्हेंबर, १९९०

## शासन निर्णय

उपरोक्त दिनांक २३ सप्टेंबर, १९७५ आणि दिनांक ७ जुलै, १९७६ च्या शासन निर्णयानुसार एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व चतुर्थश्रेणीमध्ये तीन वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यास तृतीय श्रेणीतील फक्त लिपिक पदावर त्या त्या विभागात / कार्यालयात त्या त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या पदांच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. पदोन्नतीची ही संधी लिपिक पदाव्यतिरिक्त लिपिक-टंकलेखक / टंकलेखक या पदांसाठीही उपलब्ध करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबतीत सचिव समितीच्या दिनांक २४ डिसेंबर, १९८७ रोजी झालेल्या बैठकीतील शिफारशी लक्षात घेऊन आणि उपरोक्त दिनांक २६ नोव्हेंबर, १९९० च्या शासन निर्णयातील आदेशानुसार लिपिक, लिपिक-टंकलेखक आणि टंकलेखक या संवर्गाचे एकत्रिकरण करुन लिपिक-नि-टंकलेखक असा एकच संवर्ग निर्माण करण्यात आला आहे हेही विचारात घेऊन चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांना तृतीय श्रेणीतील लिपिक-नि-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबत आता पुढीलप्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

(१) एस.एस.सी.अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि चतुर्थश्रेणीत तीन वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याला तृतीयश्रेणीतील त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-नि-टंकलेखक पदांच्या २५% पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

(२) चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांना त्यांनी टंकलेखनातील आवश्यक गती (प्र.मि. ४० शब्द इंग्रजी आणि ३० शब्द मराठी) असल्याचे नियमानुसार विहित केलेले प्रमाणपत्र (गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट) सादर करण्याच्या अटीवर तृतीय श्रेणीतील लिपिक-नि-टंकलेखक या पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

(३) चतुर्थश्रेणीत प्रवेश करताना एस.एस.सी.किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ज्या दिवशी त्यांची तीन वर्षे सलग सेवा पूर्ण होईल तो दिनांक जेष्ठतेचा दिनांक समजण्यात यावा व चतुर्थश्रेणीत नियुक्ती झाल्यानंतर एस.एस.सी.किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची तीन वर्षे सलग सेवा झाली असल्यास एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक जेष्ठतेचा दिनांक समजण्यात यावा.

(४) प्रत्येक विभागाने प्रत्येक जिल्ह्यातील आपापल्या कार्यालयांसाठी (जिल्हा स्तरावर) स्वतंत्र अशी सामायिक जेष्ठता यादी तयार करुन त्या त्या जिल्ह्यातील आपल्या विभागाची सर्व कार्यालये मिळून त्या विशिष्ट वर्षी उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांपैकी २५% पदे चतुर्थश्रेणीतील पात्र व्यक्तींच्या जेष्ठता यादीतून भरावीत.

(५) चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी ठेवण्यासाठी प्रत्येक विभागाने त्या त्या जिल्ह्यातील आपापल्या कार्यालयांमधून एखाद्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

(६) मंत्रालयीन विभागांच्या बाबतीत मात्र सध्याप्रमाणेच प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र यादी तयार करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा.म.भणगे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक :- आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२-८५/तेरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ११ जून, १९९१.

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-१०८५/८५३/ प्र.क्र. ७२-८५/तेरा, दिनांक १५ एप्रिल, १९९१

**शुध्दीपत्रक :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र. ७२-८५/तेरा, दिनांक १५ एप्रिल, १९९१ मधील क्रमांक २ मध्ये कंसात नमूद केलेल्या "(प्र.मि. ४० शब्द इंग्रजी आणि ३० शब्द मराठी)" या शब्दाऐवजी "(प्र.मि.४० शब्द इंग्रजी किंवा ३० शब्द मराठी)" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भा.म.भणगे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

<u>चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत</u>

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र. ७२-८५/तेरा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ जून, १९९२.

वाचा-१] शासन निर्णय, क्र. आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र. ७२-८५/तेरा, दिनांक १५ एप्रिल, १९९१.

<u>शासन निर्णय</u>:- चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबतचे आदेश शासन निर्णय, क्रमांक आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२-८५/तेरा, दिनांक १५ एप्रिल, १९९१ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशातील [२] संदर्भात विविध विभागांकडून अशी पृच्छा करण्यात येते की, "चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांना, टंकलेखनातील आवश्यक गती [प्र.मि. ४० शब्द इंग्रजी किंवा ३० शब्द मराठी] असल्याचे नियमानुसार विहीत केलेले प्रमाणपत्र [गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट] धारण केलेल्यांना पदोन्नती द्यावी किंवा एक वर्षात/दोन वर्षात सादर करण्याच्या अटीवर पदोन्नती देण्यात यावी किंवा कसे" या संदर्भात असे स्पष्टीकरण करण्यात येते की, सेवा प्रवेश नियमातील अटींची पूर्तता प्रथमत: होणे आवश्यक आहे. यास्तव चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांनी टंकलेखनातील आवश्यक गती असल्याचे नियमानुसार विहीत केलेले प्रमाणपत्र [गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट] धारण केलेले असेल तरच त्यांना तृतीयश्रेणीत पदोन्नती देण्यात यावी.

२. त्याचप्रमाणे असेही स्पष्ट करण्यात येते की, चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांची वर्ग-४ मधून वर्ग-३ मध्ये पदोन्नती देण्यापूर्वी, वर्ग-४ मधील पदावर नियमित स्वरूपात अर्हताकारी तीन वर्षे सेवा होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

स.कि. चौधरी
[स.कि. चौधरी]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**परिपत्रक क्रमांकः आरटीआर-१४०३/८४/प्र.क्र.५४/०३/१३,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांकः १० मे, २००५**

वाचा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि. १५-४-१९९१

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९४/प्र.क्र.४/ ९४/१२, दि. ७-३-१९९६

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/ ९७/१६ब, दि. १८-१०-१९९७

**प्रस्तावना**

उपरोक्त अनुक्रमांक १ येथे नमूद केलेल्या दिनांक १५/४/१९९१ च्या शासन निर्णयान्वये गट "ड" मधील कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात काही अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. त्यामधील एक अट अशी आहे की, सदर शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता होत असल्यास त्या त्या विभागात /कार्यालयात त्या त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-टंकलेखक पदाच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती द्यावी. तथापि, उपरोक्त अनुक्रमांक २ येथे नमूद केलेल्या दिनांक ७ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये सेवाभरतीचे प्रमाण निश्चित करताना हे प्रमाण त्या त्या संवर्गातील कायम (Permanent) आणि हंगामी (Temporary) अशा दोन्ही स्वरूपांच्या एकूण मंजूर पदांच्या पदसंख्येला लावण्याबाबत आदेशित केले आहे. यास्तव दिनांक १५/४/१९९१ च्या आदेशातील विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-टंकलेखक पदाच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्याची तरतूद उपरोक्त क्रमांक २ येथील दिनांक ७ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित झाली आहे.

त्याचप्रमाणे अनुक्रमांक ३ येथे नमूद केलेल्या दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणविषयक तरतुदी गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देताना लागू करावयाच्या आहेत. कमी संवर्ग संख्या असलेल्या कार्यालयातील गट "ड" च्या कर्मचाऱ्यांना गट "क" मध्ये पदोन्नती मिळण्यासंदर्भात कोटा निश्चित करणे तसेच गट "ड" मधून गट "क" मध्ये पदोन्नती देण्यासाठी संगणक ज्ञानाची अर्हता आवश्यक करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या दिनांक १५/४/१९९१ च्या आदेशामध्ये अंशतः बदल करून आता पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१) गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देताना प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २५ टक्के पदांऐवजी लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

मात्र असे करताना ज्या कार्यालयात लिपिकवर्गीयांची पदे ४ पेक्षा कमी आहेत त्या कार्यालयाकरीता पुढील सूत्राचा अवलंब करावा.

| लिपिकवर्गीय पदांची संख्या | गट "ड" संवर्गातील पदांसाठी निश्चित करावयाची कमाल पदे |
|---|---|
| १ | ० |
| २ | १ |
| ३ | १ |

या सूत्रामुळे लिपिकवर्गीय पदे ४ पेक्षा कमी असल्यास २५ टक्क्यांची मर्यादा त्या त्या प्रमाणात शिथिल केल्याचे समजण्यात यावे.

२) गट "ड" मधील कर्मचारी गट "क" मध्ये पदोन्नत होण्यापूर्वी जर त्याने संगणकाची अर्हता प्राप्त केली नसेल तर गट "क" मधील पदावरील नियुक्तीपासून २ वर्षांच्या काळात विहित संगणक ज्ञानाची अर्हता त्यास प्राप्त करावी लागेल. अन्यथ: त्याला गट "ड" मधील पदावर पदावनत व्हावे लागेल.

३) संदर्भाधीन क्रमांक ३ येथे नमूद केलेल्या दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयामधील आरक्षणविषयक तरतुदी लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदोन्नतीच्या वाट्याला येणाऱ्या २५ टक्के पदांना लागू करून त्यानुसार होणारी आरक्षित पदे विचारात घेऊन पदोन्नत्या देण्यात याव्यात.

४) संदर्भाधीन क्रमांक १ येथील दि. १५/४/१९९१ च्या आदेशातील अर्हताप्राप्त उमेदवारांची परस्पर ज्येष्ठता राखणे, टंकलेखनाची विहित वेगमर्यादा प्राप्त करणे इत्यादी अटी यामुळे देखील तशाच कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश लोखंडे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.आरटीआर-१४०८/प्र.क्र.६४/२००८/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ जुलै,२००८.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.१५ एप्रिल,१९९१.
२) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.११ जून,१९९१.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.२१ जून,१९९२ .
४) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०९४/प्र.क्र.४/९४/१२, दि.७ मार्च, १९९६.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि.१८ ऑक्टोबर,१९९७.
६) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीआर-१४०३/८४/प्र.क्र.५४/०३/१३. दि.१० मे,२००५.

**प्रस्तावाना**

उपरोक्त क्र.१,२,३ व ६ येथील शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक संवर्गात पदोन्नती देण्यासाठी अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. यापैकी अनुक्रमांक-६ येथील शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पदावर पदोन्नती देण्याचे आदेश आहेत.

२. तथापि, अनेक प्रशासकीय विभागांच्या आस्थापनांतर्गत लिपिक-टंकलेखकाची पदे २५ टक्के प्रमाणानुसार पदोन्नतीने भरण्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे मोठया प्रमाणावर रिक्त रहात/राहिल्याचे निदर्शनास आले आहे. राज्य शासनाची पद भरती मोहिम विचारात घेता लिपिक-टंकलेखक संवर्गातील २५ टक्के प्रमाणात पदे गट-ड मधून पदोन्नतीने भरण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा अशी मागणी विविध प्रशासकीय विभागांनी केली होती.

**शासन निर्णय**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या दि.१०.५.२००५ च्या आदेशामध्ये अंशतः बदल करुन आता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१) गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याचे प्रमाण लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पर्यंत राहील.

वरील बदलानंतर ज्या आस्थापनांमध्ये गट-ड मधून गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यासाठी २५ टक्के पर्यंतच्या मर्यादेत उमेदवार उपलब्ध नसतील अशा आस्थापनेवरील पदे सरळसेवेने भरता येतील.

ज्या कार्यालयात लिपिकवर्गीयांची पदे ४ पेक्षा कमी आहेत त्या कार्यालयाकरीता दि.१०.५.२००५ च्या शासन निर्णय मधील सुत्राचा अवलंब करावा.

| लिपिकवर्गीय पदांची संख्या | गट "ड" मधील पदोन्नतीसाठी नियत करावयाची कमाल पदे |
|---|---|
| १ | ० |
| २ | १ |
| ३ | १ |

२) संदर्भाधीन क्रमांक १ ते ३ व ६ येथील दि.१५.४.१९९१, दि.११.६.१९१, दि.२९.६.१९९३ व दि.१०.५.२००५ च्या आदेशातील इतर अटी यापुढे देखील तशाच कायम राहतील.

वरील शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८०७०८१७३१५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.ल.पाठक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.